— DEVELOPED NATIONS —

# डेवलप्ड नेशन्स लॉ न्यूज

▪ PRGI No. : MHMUL/25/A0594

Journalism for justice

♦ वर्ष १ ♦ अंक : ४ ♦ साप्ताहिक ♦ पुणे, शनिवार, दि. ०५ सप्टेंबर ते शुक्रवार दि. ११ सप्टेंबर २०२६ ♦ पाने : १२ ♦ स्वागत मूल्य : १० रु. अंक व जाहिरातींसाठी : ९९२२४१२४५१

## विशेष संपादकीय

## पुण्यात रुजते ते जगात पोहोचते; मग डीजेचा दणदणाटच का?

छत्रपती शिवरायांच्या पुण्याने जगाला स्वराज्याची प्रेरणा दिली, टिळकांच्या गणेशोत्सवाने लोकजागृतीची; आज जगाला आपण बिभत्सपणा आणि ध्वनिउन्माद देणार आहोत का?

पुणे हे केवळ शहर नाही; महाराष्ट्राच्या विचारांची, संस्कृतीची आणि सामाजिक परिवर्तनाची प्रयोगभूमी आहे. छत्रपती शिवरायांच्या इतिहासाने या भूमीला शौर्य, स्वाभिमान आणि लोककल्याणाची शिकवण दिली. महात्मा फुले, आगरकर, गोखले आणि लोकमान्य टिळकांच्या विचारांनी पुण्याला बौद्धिक उंची दिली. म्हणूनच पुण्यात रुजलेली सांस्कृतिक कल्पना केवळ पुण्यापुरती राहत नाही; तिचे पडसाद महाराष्ट्रात, देशात आणि जगभर उमटतात. मग या पुण्याने जगाला गणेशोत्सवाच्या नावाने काय द्यायचे—संस्कृती आणि सामाजिक जागृती की बिभत्स देखावे आणि डीजेचा दणदणाट?

लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी १८९३ मध्ये सार्वजनिक गणेशोत्सवाला व्यापक स्वरूप दिले, तेव्हा त्यामागे केवळ धार्मिक भावना नव्हती. समाजातील भेद विसरून लोकांनी एकत्र यावे, सार्वजनिक व्यासपीठ निर्माण व्हावे, राष्ट्रभावना जागी व्हावी आणि जनतेत स्वाभिमान निर्माण व्हावा, हा त्यांचा दूरदर्शी हेतू होता. त्यामुळे पुण्याचा गणेशोत्सव हा धार्मिक उत्सवापलीकडे जाऊन सामाजिक आणि राष्ट्रीय जागृतीचे माध्यम बनला. आज त्याच उत्सवाकडे पाहताना प्रश्न पडतो—ज्यांनी गणपतीच्या मंडपातून समाजाला जागवले, त्यांच्या वारशात आपण आज समाजाची झोप उडवणारा डीजे आणणार आहोत का? गणेशोत्सवात आनंद नको, असे कोणी म्हणत नाही. ढोल-ताशांचा नाद, लेझीम, पारंपरिक वाद्ये, सांस्कृतिक कार्यक्रम, देखावे, भजन-कीर्तन आणि मिरवणुका हे उत्सवाचे अविभाज्य भाग आहेत. प्रश्न आहे तो मर्यादेचा आणि विवेकाचा. उत्सवाच्या नावाखाली दुसऱ्याच्या घरातील शांतता हिरावून घेणे ही परंपरा होऊ शकत नाही. कायद्याने निश्चित केलेल्या ध्वनीमर्यादा पाळणे ही भक्तीविरोधी भूमिका नसून जबाबदार नागरिकत्वाची किमान अट आहे. निवासी क्षेत्रात दिवसाची अनुमत ध्वनीपातळी ५५ डेसिबल आणि रात्री ४५ डेसिबल आहे; शांतता क्षेत्रासाठी ती अनुक्रमे ५० आणि ४० डेसिबल आहे. सार्वजनिक ठिकाणी ध्वनिवर्धकाच्या वापराबाबतही कायदेशीर मर्यादा आहेत. त्यामुळे 'गणेशोत्सव आहे म्हणून आवाज कितीही वाढवू' असा अधिकार कोणालाही मिळत नाही. उत्सवाला परवानगी असू शकते; कायदा मोडण्याला नाही.

डॉ. अशोक बालगुडे
निवासी संपादक

'वर्षातून काही दिवसच उत्सव असतो' हा युक्तिवादही तितकाच तकलादू आहे. उत्सव काही दिवसांचा असला, तरी त्या दिवसांतही नागरिकांचे आयुष्य सुरूच असते. रुग्ण उपचार घेत असतात, विद्यार्थी अभ्यास करीत असतात, वृद्ध विश्रांती घेत असतात, लहान मुले झोपत असतात आणि अनेक जण रात्रीची पाळी करून घरी परतत असतात. त्यांच्या कानांना उत्सवाची सुट्टी नसते. आपल्या आनंदाची किंमत दुसऱ्याच्या आरोग्याने का मोजावी? याहून गंभीर प्रश्न बिभत्स देखाव्यांचा आहे. गणेशोत्सव हा कला, संस्कृती आणि सामाजिक संदेशाचा उत्सव आहे. प्रसिद्धीच्या हव्यासापोटी अश्लीलता, हिंसाचाराचे विकृत प्रदर्शन किंवा केवळ गर्दी खेचण्यासाठी केलेले भडक सादरीकरण वाढत असेल, तर त्याला सांस्कृतिक स्वातंत्र्य म्हणायचे की सांस्कृतिक अधःपतन? पुण्यात जे दिसते, त्याकडे महाराष्ट्र पाहतो; महाराष्ट्र जे स्वीकारतो, त्याचे अनुकरण देश करतो. मग आपण अनुकरण करण्यासारखे काय निर्माण करीत आहोत? जगातील मोठे उत्सव त्यांच्या सांस्कृतिक वैशिष्ट्यांसाठी ओळखले जातात. ब्राझीलचा कार्निव्हल, जपानचे सांस्कृतिक उत्सव, स्पेनमधील पारंपरिक उत्सव किंवा युरोपातील विविध लोकउत्सव पान २ पहा ▶▶

# बाप्पाच्या उत्सवात आवाजा चा उन्माद नको!




## डीजेविरोधात पुणेकरांचा एल्गार; वकिलांचाही नियमपालनाचा आग्रह

✦ ॲड. युगंधर ताजणे
डेवलप्ड नेशन्स
developednationslaw@gmail.com

**पुणे :** गणेशोत्सवाला अवघे काही दिवस उरले असताना डीजे आणि ध्वनिप्रदूषणाच्या प्रश्नावर पुणेकर एकवटले आहेत. 'उत्सवाला विरोध नाही; मात्र डीजेच्या उन्मादाला विरोध आहे,' अशी भूमिका घेत नागरिकांनी गुडलक कॅफे चौक ते अभिनव चौक आणि शनिवारवाडा असा शांततापूर्ण मोर्चा काढून प्रशासनाचे लक्ष वेधले. डीजे-डॉल्बीच्या कर्णकर्कश आवाजावर नियंत्रण आणावे आणि गणेशोत्सव पारंपरिक व शिस्तबद्ध पद्धतीने साजरा करावा, अशी मागणी करण्यात आली. ध्वनिप्रदूषणाच्या नियमांची काटेकोर अंमलबजावणी व्हावी, असा आग्रह वकिलांनीही धरला आहे.

### ✦ ध्वनिप्रदूषणाविरोधात नागरिकांचा एल्गार

गणेशोत्सव हा श्रद्धा, आनंद आणि सामाजिक एकोप्याचा उत्सव आहे. मात्र मोठ्या आवाजाच्या स्पर्धेमुळे उत्सवाचे स्वरूप बदलत चालल्याची खंत नागरिकांनी व्यक्त केली. डीजेच्या आवाजाचा लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि सर्वसामान्यांना होणारा त्रास लक्षात घेता उत्सव साजरा करताना सामाजिक भान ठेवणे




आवश्यक आहे. उत्सव नियमांच्या चौकटीत आणि शिस्तीने झाला तर त्याचे समाधान वेगळे असेल, असे ॲड. परिमल देशमुख यांनी सांगितले.

### ✦ नियमभंग करणाऱ्यांवर कठोर कारवाई

सरसकट डीजे बंदीपेक्षा ध्वनीमर्यादांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी. नियम मोडणाऱ्यांवर मोठा दंड आकारावा; त्याचवेळी गणेश मंडळांच्या कार्यकर्त्यांना विश्वासात घेऊन संवादातून प्रश्न सोडवावा, असे ॲड. प्रसाद निकम यांनी सांगितले. ध्वनिप्रदूषणाचा त्रास सर्वसामान्यांना होतो, याची जाणीव मंडळांच्या कार्यकर्त्यांना करून देणेही आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

'डीजेला विरोध नाही; मात्र आवाजाची पातळी प्रशासनाने निश्चित केलेल्या मर्यादेतच असावी,' असे ॲड. अक्षय निचित यांनी स्पष्ट केले. उत्सवाच्या नावाखाली रस्त्यावर मंडप उभारून वाहतुकीला अडथळा निर्माण होणार नाही, याचीही पान २ पहा ▶▶

सर्व प्रकारच्या जाहीर सूचना/ वकील नोटीस आणि अन्य जाहिराती स्वीकारण्याकरिता
संपर्क : श्रेयश दहिवळ, मो. ९९२२४१२४५१
ऑफिस संपर्क : ०२०-२९९९ २५३०

QR Code स्कॅन करा, पे करा.

वर्गणीचे पर्याय | स्वागत मूल्य : फक्त रु. १० एक वर्षासाठी रु. ५००

रक्कम भरल्याची पेमेंट रिसीट,आपले नाव, पिनकोडसह पूर्ण पत्ता आणि मोबाईल नंबर : ९९२२४१२४५१ या क्रमांकावर मॅसेज करा!

YUVRAJ
DHAMALE CORP

'युवराज ढमाले कोर्प' कडून
— DEVELOPED NATIONS —
डेवलप्ड नेशन्स लॉ न्यूज
वृत्तपत्राला पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा!

पान १ वरून...

## पुण्यात रुजते ते जगात पोहोचते...

भव्यता, लोकसहभाग आणि आनंद यांच्यासोबत त्यांच्या संस्कृतीची स्वतंत्र ओळख जपली जाते. पुण्याचा गणेशोत्सवही जगात ओळखला जातो तो केवळ गर्दी किंवा आवाजासाठी नव्हे, तर त्याच्या ऐतिहासिक, सामाजिक आणि सांस्कृतिक परंपरेसाठी. मग आपण त्याची ओळख 'कोणाचा डीजे मोठा?' अशी करणार आहोत का?

पुणे हे छत्रपती शिवरायांचे पुणे आहे. इथे शौर्याची परंपरा आहे; उन्मादाची नाही. इथे लोकमान्य टिळकांची परंपरा आहे; विवेकशून्य प्रदर्शनाची नाही. इथे महात्मा फुल्यांची सामाजिक समतेची शिकवण आहे; बिभत्सतेची नाही. इथे आगरकरांचा बुद्धिप्रामाण्यवाद आहे; अंधानुकरणाचा नाही. या इतिहासाला साजेसा गणेशोत्सव आपण उभा करणार आहोत की इतिहासाच्या नावावर वर्तमानाची विटंबना करणार आहोत?

म्हणूनच टिळकांचा गणेशोत्सव पुन्हा सुरू करण्याची गरज आहे. गणेशोत्सव बंद करण्याची नव्हे, तर त्याचा आत्मा पुन्हा जागवण्याची गरज आहे. मंडपात सामाजिक प्रश्नांवर व्याख्याने हवीत, विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक उपक्रम हवेत, रक्तदान-पर्यावरण-व्यसनमुक्ती-नागरिक कर्तव्य यावर जनजागृती हवी. देखावे केवळ डोळ्यांना दिपवणारे नव्हे, तर मनाला विचार करायला लावणारे हवेत. आणि मिरवणूक? मिरवणूक अशी असावी की जगाने पाहावी; ऐकून कान झाकू नयेत. ढोल-ताशांचा ताल असावा; पण ध्वनीचा उन्माद नसावा. तरुणाईचा उत्साह असावा; पण दुसऱ्याच्या अधिकारांची पायमल्ली नसावी. भक्ती असावी; पण विवेकही असावा. 'पुण्यात विकलं जातं ते जगात विकलं जातं' असे म्हटले जाते. सांस्कृतिक अर्थाने पाहिले तर पुण्याचा प्रभाव याहून मोठा आहे. पुण्यात निर्माण झालेली सामाजिक चळवळ, सांस्कृतिक परंपरा आणि सार्वजनिक विचार महाराष्ट्राला दिशा देतात. म्हणूनच पुण्याच्या गणेशोत्सवाने जगाला काही देण्याची वेळ आली आहे. डीजेचा दणदणाट नव्हे, तर शिस्तबद्ध उत्सवाचा आदर्श. छत्रपती शिवरायांनी स्वराज्य उभे केले. लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सवातून समाजमन उभे केले. आता पुण्याची जबाबदारी आहे—गणेशोत्सवाचे सांस्कृतिक स्वराज्य पुन्हा प्रस्थापित करण्याची. कारण गणेश म्हणजे बुद्धी, विवेक आणि मंगलतेचे प्रतीक. बुद्धीच्या देवतेच्या उत्सवात विवेक हरवला तर त्यापेक्षा मोठा विरोधाभास कोणता? पुण्याचा गणेशोत्सव जगप्रसिद्ध आहे; तो तसाच राहिला पाहिजे. पण जगाने पुण्याकडे पाहताना असेही म्हणायला हवे—'हे ते शहर आहे, ज्याने गणेशोत्सवाला सार्वजनिक केले आणि उत्सवाला शिस्तही शिकवली!' पुण्याने देशाला सार्वजनिक गणेशोत्सव दिला. आता पुण्याने जगाला जबाबदार, संस्कारित आणि ध्वनिप्रदूषणमुक्त सार्वजनिक उत्सवाचा आदर्श द्यावा. कारण भक्तीला डेसिबल लागत नाही, श्रद्धेला स्पीकर लागत नाही आणि गणरायाला आपल्या भक्तीचा पुरावा कर्णकर्कश आवाजात द्यावा लागत नाही.

प्रश्न एकच—लोकमान्य टिळकांचा 'जागवणारा आवाज' पुढे न्यायचा की डीजेचा 'बहिरा करणारा आवाज'? उत्तर पुण्यानेच द्यायचे आहे.

## बाप्पाच्या उत्सवात आवाजा चा उन्माद नको!



मंडळांनी काळजी घ्यावी. उत्सवाबरोबरच सार्वजनिक शिस्तीचा आदर्श निर्माण करण्याची जबाबदारी मंडळांची आहे.

### ✦ सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांचे पालन

डीजे आणि ध्वनिक्षेपकांचा वापर कायदा व सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार झाला पाहिजे. सर्वसामान्य नागरिकांना त्रास होणार नाही, याची दक्षता घेणे आवश्यक आहे. मुख्य मिरवणूक मार्गावर सर्व मंडळांना सरसकट परवानगी देण्याऐवजी प्रशासनाने योग्य नियोजन करावे, अशी भूमिका ॲड. सचिन हिंगणेकर यांनी मांडली. गेल्या काही वर्षांत नव्या मंडळांची संख्या वाढल्याने मिरवणूक मार्गावरील व्यवस्थापनाचे आव्हानही वाढले आहे, याकडे त्यांनी लक्ष वेधले. उत्सवाच्या नावाखाली कानठळ्या बसविणारा आवाज करून आनंद साजरा करणे योग्य नाही. ध्वनिप्रदूषणाचा त्रास सर्वांनाच होत असताना त्याकडे दुर्लक्ष करण्याऐवजी सुजाण नागरिकांनी समाजाला दिशा दाखवावी. आधुनिकतेच्या नावाखाली परंपरेचे स्वरूप बिघडवण्याऐवजी रूढी-परंपरा जपत संयमाने उत्सव साजरा करण्याची गरज आहे, असे ॲड. विजयसिंह ठोंबरे पाटील यांनी सांगितले. पुणेकरांचा विरोध गणेशोत्सवाला नसून ध्वनीच्या अतिरेकाला आहे. उत्सवाचा आनंद दुसऱ्याच्या शांततेची किंमत मोजून मिळता कामा नये, हीच नागरिकांची भूमिका आहे. त्यामुळे ध्वनिप्रदूषणाचे नियम केवळ कागदावर न राहता त्यांची काटेकोर अंमलबजावणी व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. श्रद्धेचा उत्सव आनंद देणारा असावा; कानठळ्या बसविणारा नव्हे!

# आईच्या मायेचा हिशेब करता येत नाही!



ॲड. विश्वनाथ गरूड

मुलांचा सांभाळ 'अर्धा-अर्धा' वाटण्याचा व्यवहार नाही; सर्वोच्च न्यायालयाचा संवेदनशील निर्वाळा. घटस्फोटाने पती-पत्नीचे नाते संपते; पण पालकत्व संपत नाही. वैवाहिक नाते तुटल्यानंतरही मुलांच्या शिक्षणाची, आरोग्याची, संगोपनाची आणि सुरक्षित भविष्याची जबाबदारी आई-वडिलांचीच राहते. त्यामुळे पती-पत्नीच्या वैवाहिक वादाची किंमत मुलांनी मोजता कामा नये. मुलांच्या पालनपोषणाचा खर्च केवळ 'अर्धा-अर्धा' अशा साध्या गणिताने ठरवता येणार नाही, हे सर्वोच्च न्यायालयाने अधोरेखित केले आहे. विशेषतः आई कमावती आहे म्हणून मुलांच्या संगोपनातील तिचे योगदान कमी होत नाही, हा या निर्णयाचा गाभा आहे.

कायद्याच्या अभ्यासात घटस्फोटाचा दावा तयार करताना एक गमतीदार; पण तितकीच अर्थपूर्ण सूचना केली जाते—जोडप्याला मुले नाहीत, असे गृहीत धरून ड्राफ्ट करा! कारण मुले असतील तर घटस्फोटाचा वाद केवळ पती-पत्नीपुरता मर्यादित राहत नाही. मुलांचा ताबा, पालनपोषण, शिक्षण, आरोग्य, भविष्यातील गरजा आणि त्यासाठी होणारा खर्च असे अनेक प्रश्न त्याला जोडले जातात. प्रत्यक्ष आयुष्यात मात्र या प्रश्नांची उत्तरे कोणत्याही कायद्याच्या पुस्तकातील काही कलमांइतकी सोपी नसतात. याच पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय महत्त्वाचा ठरतो. या प्रकरणातील पती-पत्नी दोघेही डॉक्टर आहेत. २००६ मध्ये त्यांचा विवाह झाला आणि त्यांना दोन मुली आहेत. कालांतराने वैवाहिक संबंध बिघडले. पत्नी दोन्ही मुलींना घेऊन पतीपासून वेगळी राहू लागली. २०२२ मध्ये तिने पोटगीसाठी अर्ज केला. पत्नी स्त्रीरोगतज्ज्ञ असून तिचे मासिक उत्पन्न सुमारे दीड लाख रुपये होते, तर पती बालरोगतज्ज्ञ असून त्याचे मासिक उत्पन्न सुमारे दोन लाख रुपये होते.

कौटुंबिक न्यायालयाने पत्नी स्वतः कमावत असल्याने तिला स्वतंत्र पोटगी देण्यास नकार दिला; मात्र दोन्ही मुलींच्या शिक्षणाचा आणि पालनपोषणाचा खर्च आई करत असल्याने पतीला प्रत्येक मुलीस दरमहा ३० हजार रुपये देण्याचा आदेश दिला. म्हणजेच दोन्ही मुलींसाठी दरमहा एकूण ६० हजार रुपये देण्याची जबाबदारी पतीवर टाकण्यात आली.

पतीने या निर्णयाला उच्च न्यायालयात आव्हान दिले. पत्नी स्वतः कमावत असल्याने मुलींच्या खर्चाची जबाबदारी दोन्ही पालकांनी समान प्रमाणात उचलावी, असा दृष्टिकोन स्वीकारत उच्च न्यायालयाने पतीची जबाबदारी निम्मी केली. प्रत्येक मुलीस १५ हजार रुपये, म्हणजे दोन्ही मुलींसाठी दरमहा ३० हजार रुपये देण्याचे आदेश देण्यात आले. या निर्णयाविरोधात पत्नी सर्वोच्च न्यायालयात गेली. सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाचा निर्णय रद्द करून कौटुंबिक न्यायालयाचा आदेश कायम ठेवला. या निकालातून एक महत्त्वाचा सिद्धांत पुढे आला—मुलांच्या संगोपनाचा खर्च हा केवळ अंकगणिताचा विषय नाही.

आई कमावती आहे म्हणून तिच्या उत्पन्नाचा आधार घेत पतीची जबाबदारी आपोआप निम्मी करता येणार नाही. मुलांसोबत राहणाऱ्या पालकाचे योगदान केवळ त्याने खर्च केलेल्या पैशांत मोजता येत नाही. मुलांना वेळ देणे, त्यांची काळजी घेणे, आजारपणात त्यांच्यासोबत राहणे, शाळा-शिक्षणाचा पाठपुरावा करणे, त्यांच्या भावनिक गरजा समजून घेणे, सुरक्षिततेची काळजी घेणे आणि त्यांच्या भवितव्याचा विचार करणे—हे सर्व संगोपनाचाच भाग आहे. आईचे उत्पन्न दिसते; तिचे अदृश्य श्रम मात्र अनेकदा दिसत नाहीत. घर, नोकरी आणि मुलांचे संगोपन या तिन्ही आघाड्यांवर काम करणाऱ्या आईच्या वेळेला आणि श्रमांना पगाराची पावती नसते. म्हणून त्या श्रमांची किंमत शून्य होत नाही. मुलांच्या आयुष्यात आईची उपस्थिती ही आर्थिक योगदानाइतकीच, किंबहुना अनेकदा त्याहून अधिक महत्त्वाची असते. सर्वोच्च न्यायालयाच्या भूमिकेचा व्यापक सामाजिक अर्थ येथे लक्षात घ्यायला हवा. आज महिला शिक्षित आहेत, आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी आहेत आणि व्यावसायिक क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने काम करत आहेत. ही बदलती सामाजिक वस्तुस्थिती स्वागतार्ह आहे. मात्र, स्त्री कमावते म्हणून घरातील आणि मुलांच्या संगोपनाची जबाबदारी तिच्यावर अधिक असावी, असा अर्थ त्यातून काढता येणार नाही. आर्थिक स्वावलंबन म्हणजे पालकत्वाची एकतर्फी जबाबदारी नव्हे. घटस्फोटानंतर आई-वडिलांचे संबंध संपुष्टात येऊ शकतात; पण मुलांचे त्यांच्याशी असलेले नाते कायम राहते. मुलांना कोणत्याही पालकाच्या वैवाहिक संघर्षात ओढले जाऊ नये. त्यांच्या शिक्षणात खंड पडू नये, त्यांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष होऊ नये आणि त्यांना आर्थिक असुरक्षिततेला सामोरे जावे लागू नये, ही दोन्ही पालकांची जबाबदारी आहे. या प्रकरणात आणखी एक महत्त्वाचा कायदेशीर पैलू आहे. कौटुंबिक न्यायालयाने संबंधित परिस्थिती, पालकांचे उत्पन्न आणि मुलांच्या गरजा विचारात घेऊन निर्णय दिल्यानंतर केवळ पत्नी कमावती आहे, या एका कारणावरून पतीची जबाबदारी निम्मी करणे योग्य नाही, असा सर्वोच्च न्यायालयाचा दृष्टिकोन आहे. न्यायालयीन निर्णयात केवळ उत्पन्नाची तुलना न करता मुलांच्या प्रत्यक्ष गरजा आणि त्यांच्या संगोपनाची वस्तुस्थितीही विचारात घेणे आवश्यक आहे. या निकालामुळे एक मूलभूत प्रश्न समाजासमोर उभा राहतो—घरातील श्रमांची किंमत आपण केवळ पगाराच्या आकड्यानेच ठरवणार आहोत का?

आई सकाळपासून रात्रीपर्यंत घर आणि नोकरी या दोन्ही जबाबदाऱ्या सांभाळत असेल, तर तिचे उत्पन्न हा तिच्या संपूर्ण योगदानाचा एक भाग आहे. मुलांच्या संगोपनासाठी ती देत असलेला वेळ, मानसिक ऊर्जा, भावनिक आधार आणि सातत्यपूर्ण काळजी यांची स्वतंत्र आर्थिक मोजपट्टी करता येत नाही. त्यामुळे 'ती कमावते' या एका वाक्यात तिच्या संपूर्ण भूमिकेला बांधून ठेवणे अन्यायकारक ठरेल. मुलांचे भविष्य हा पती-पत्नीच्या अहंकाराचा किंवा आर्थिक वाटाघाटींचा विषय होऊ नये. मुलांना चांगले शिक्षण, आरोग्य, सुरक्षित वातावरण आणि भावनिक स्थैर्य मिळणे हे सर्वोच्च प्राधान्य असले पाहिजे. पालकांमधील मतभेद कितीही तीव्र असले तरी त्याचा भार मुलांच्या खांद्यावर पडता कामा नये.

सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय म्हणूनच केवळ पोटगीच्या रकमेबाबतचा आदेश म्हणून पाहणे योग्य ठरणार नाही. तो पालकत्वाची सामाजिक आणि नैतिक जबाबदारी अधोरेखित करणारा निर्णय आहे. पैसा आवश्यक आहे; पण मुलांच्या संगोपनाचे संपूर्ण मूल्य पैशात सामावलेले नसते. घटस्फोटानंतर आई-वडिलांचे रस्ते वेगळे होऊ शकतात; मुलांच्या भवितव्याची वाट मात्र दोघांनी मिळून उजळवायची असते. पैशाचा हिशेब करता येतो; पण आईच्या मायेचा, वेळेचा, त्यागाचा आणि मुलांसाठी केलेल्या असंख्य अदृश्य श्रमांचा हिशेब करता येत नाही. म्हणूनच या निर्णयाचा सर्वांत मोठा संदेश साधा आहे—मुलांचा सांभाळ हा खर्च वाटून घेण्याचा व्यवहार नाही; तो पालकत्व निभावण्याचा समान धर्म आहे. ■■■

# दहा वर्षे घराचा ताबा नाही; बिल्डरला महारेराचा दणका!

## भरलेल्या रकमेवर व्याज, २० हजारांचा तक्रार खर्च देण्याचे आदेश

डेवलप्ड नेशन्स
developednationslaw@gmail.com

**पुणे :** घराचा ताबा देण्याची करारातील मुदत उलटून तब्बल दहा वर्षांहून अधिक काळ लोटला, तरी सदनिकेचा ताबा आणि भोगवटा प्रमाणपत्र न दिल्याने महारेराने विकासकाला दणका दिला आहे. तक्रारदाराने भरलेल्या रकमेवर १ ऑक्टोबर २०१४ पासून प्रत्यक्ष ताबा व भोगवटा प्रमाणपत्र मिळेपर्यंत नियमानुसार व्याज, तसेच २० हजार रुपये तक्रार खर्च म्हणून देण्याचे आदेश महारेराचे सदस्य रवींद्र देशपांडे यांनी दिले.

श्रीकृष्ण गोविंद यादव यांनी 'शामित सिंगलटन' प्रकल्पातील सी-४०७ सदनिकेसाठी विकासक एस. एस. सिंगलटन यांच्याविरोधात तक्रार दाखल केली होती. प्रकल्पाची महारेरा नोंदणी क्रमांक P51500009966 असून, नोंदीनुसार पूर्णत्वाची प्रस्तावित तारीख ३१ ऑगस्ट २०१९ होती. मात्र, अद्याप भोगवटा प्रमाणपत्र मिळालेले नाही. प्रकल्पाची नोंदणी मुदतही संपली असून, मुदतवाढीसाठी विकासकाने अर्ज केलेला नसल्याचे आदेशात नमूद आहे. तक्रारदाराने सदनिकेसाठी २२ लाख १ हजार रुपये मोबदला निश्चित केला होता. २०१३ मध्ये नोंदणीकृत विक्री करार झाला आणि त्यानुसार ३० सप्टेंबर २०१४ रोजी ताबा देणे अपेक्षित होते. तक्रारदाराने आतापर्यंत २० लाख ९० हजार १५० रुपये भरले आहेत.

मात्र, बांधकाम पूर्ण न झाल्याने ताबा मिळाला नाही. वारंवार संदेश, ई-मेल आणि प्रत्यक्ष भेटींद्वारे पाठपुरावा करूनही विकासकाकडून समाधानकारक प्रतिसाद न मिळाल्याने तक्रारदाराने महारेराकडे धाव घेतली. सुनावणीवेळी तक्रारदाराच्या वतीने ॲड. हर्षद ननावरे उपस्थित होते. विकासकाला म्हणणे मांडण्याची संधी देऊनही त्याने कोणतेही उत्तर अथवा तक्रारदाराच्या आरोपांचे खंडन दाखल केले नाही. करारातील मुदतीनंतर ताबा देण्यात झालेला विलंब हा किरकोळ नसून गंभीर आणि दीर्घकाळाचा असल्याचे महारेराने स्पष्ट केले.

विकासकाने करारातील तसेच रेरा कायद्यातील वैधानिक जबाबदाऱ्यांचे पालन केले नसल्याचेही प्राधिकरणाने नमूद केले. महारेराने तक्रार मंजूर करत सदनिकेसाठी विकासकाकडे भरलेल्या रकमेसह संबंधित शुल्कांचा विचार करून, कर, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क आणि वैधानिक प्राधिकरणांना भरलेले इतर शुल्क वगळून, १ ऑक्टोबर २०१४ पासून प्रत्यक्ष ताबा व भोगवटा प्रमाणपत्र मिळेपर्यंत महाराष्ट्र रेरा नियमांतील नियम १८नुसार व्याज देण्याचे आदेश दिले आहेत. थकीत रकमेत व्याजाची रक्कम समायोजित करता येईल; त्यानंतर काही रक्कम शिल्लक राहिल्यास ती तक्रारदाराला एकरकमी देण्याचे निर्देश आहेत.

# धर्माच्या नावाखाली 'आवाजाचे' राजकारण कशाला?

## ध्वनिप्रदूषणाला धर्माचे कवच नको; कायद्याची समान अंमलबजावणी हवी

धर्म माणसाला संयम, सहअस्तित्व आणि दुसऱ्याच्या सुखाचा विचार शिकवतो. मग धार्मिक उत्सवाच्या नावाखाली कर्णकर्कश डीजे वाजवून इतरांच्या शांततेवर अतिक्रमण करण्याला धार्मिकतेचे स्वरूप कसे देता येईल? सण साजरा करण्याचे स्वातंत्र्य प्रत्येकाला आहे; मात्र त्या स्वातंत्र्याची सीमा दुसऱ्या नागरिकाच्या अधिकारापाशी संपते. त्यामुळे धर्माच्या नावाखाली 'आवाजाचे' राजकारण करण्याची वेळ आता थांबली पाहिजे.

गेल्या अनेक वर्षांपासून गणेशोत्सवासह विविध धार्मिक सण-उत्सवांतील ध्वनिप्रदूषणाविरोधात भूमिका मांडत आहे. नागरिकांना तक्रार करता यावी, यासाठी माझा मोबाईल क्रमांक तसेच पुणे पोलिसांच्या नियंत्रण कक्षाचा क्रमांक सार्वजनिक करून आवाहन केले होते. त्यानंतर मोठ्या प्रमाणात तक्रारी प्राप्त झाल्या. एका वर्षात पुणे पोलिसांच्या नियंत्रण कक्षाकडे ध्वनिप्रदूषणासंदर्भात तब्बल ३२०० तक्रारी आल्याची माहिती मिळाली. मात्र त्यापैकी एकाही तक्रारीवर गुन्हा दाखल झाला नसल्याचे समोर आले. तक्रारींचा हा आकडा आणि कारवाईचा अभाव प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारा आहे.



**ॲड. विकास शिंदे**
(पूर्णवेळ शिवाजीनगर जिल्हा व सत्र न्यायालयात कार्यरत)

ध्वनिप्रदूषणासाठी नियम आहेत, ध्वनीची मर्यादा निश्चित आहे आणि नियमभंग झाल्यास कारवाईची तरतूदही आहे. त्यामुळे अडचण कायद्याची नसून त्याच्या अंमलबजावणीची आहे. उत्सवापूर्वी बैठका घेऊन सूचना देणे आवश्यक असले, तरी त्यानंतर प्रत्यक्ष नियमभंग झाल्यावर कारवाई न झाल्यास त्या सूचनांना अर्थ उरत नाही. गणेशोत्सवाच्या विसर्जन मिरवणुकांमध्ये हा विरोधाभास प्रकर्षाने दिसतो. पोलिसांचा मोठा बंदोबस्त असताना डीजेचा दणदणाट सुरू असतो. नियम मोडले जात असल्याचे दिसत असूनही कारवाई होत नसेल, तर नागरिकांच्या मनात कायद्याबद्दल आदर कसा निर्माण होणार? पोलिसांनी कोणत्याही दबावाला बळी न पडता नियमांची समान अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या विषयावर पाठपुरावा करताना एक महत्त्वाचा अनुभव आला.

पोलिस आयुक्तांना कायदेशीर कारवाईची पूर्वसूचना दिल्यानंतर अवघ्या एका तासात पुणे शहरात ४०० गुन्हे दाखल केल्याचे पोलिसांकडून कळविण्यात आले होते. यावरून इच्छाशक्ती असेल तर यंत्रणा प्रभावीपणे काम करू शकते, हे स्पष्ट होते. त्यामुळे ध्वनिप्रदूषण रोखणे अशक्य नाही; प्रश्न आहे तो प्रशासनाच्या निर्धाराचा. या प्रश्नाकडे कोणत्याही एका धर्माचा विषय म्हणून पाहणे चुकीचे आहे. सर्वच धर्मांच्या सण-उत्सवांमध्ये ध्वनिवर्धक आणि डीजेचा वाढता वापर ही सार्वजनिक शिस्तीची समस्या आहे. 'त्यांनी केले म्हणून आम्हीही करणार' या स्पर्धेतून आवाजाची पातळी वाढत जाते आणि त्याचा त्रास सर्वसामान्यांना सहन करावा लागतो. कायदा सर्वांसाठी समान असेल, तर त्याची अंमलबजावणीही सर्वांसाठी समान असली पाहिजे. गणेशोत्सवाचा इतिहास पाहिला तर लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाला सामाजिक संघटन आणि जनजागृतीचे माध्यम बनविले. भजन, कीर्तन, व्याख्याने, सांस्कृतिक कार्यक्रम आणि समाजप्रबोधनातून लोकांना एकत्र आणण्याची भूमिका त्यामागे होती. आज या उत्सवाची ओळख डीजेच्या आवाजाशी जोडली जात असेल, तर मूळ उद्देशापासून आपण किती दूर गेलो आहोत, याचा विचार करणे गरजेचे आहे.

भक्तीचे सामर्थ्य आवाजाच्या तीव्रतेत नसते. प्रार्थना मोठ्या स्पीकरवरून केली म्हणून तिचे महत्त्व वाढत नाही. उलट आपल्या उत्सवामुळे दुसऱ्याला त्रास होऊ नये, ही जाणीव ठेवणे हीच खरी धार्मिकता आहे. मंडळांची प्रतिष्ठा डीजेच्या क्षमतेवर नव्हे, तर शिस्तबद्ध आणि सामाजिक भान जपणाऱ्या उत्सवावर ठरली पाहिजे.

ध्वनिप्रदूषणाचा फटका विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी, आजारी व्यक्ती आणि रात्री काम करणाऱ्या नागरिकांना बसतो. त्यामुळे 'काही तासांचा प्रश्न आहे' म्हणून तो दुर्लक्षित करता येणार नाही. एखाद्याच्या आनंदाची किंमत दुसऱ्याच्या त्रासातून चुकवणे योग्य नाही. नागरिकांनी ध्वनिप्रदूषणाविरोधात तक्रार केली, तर त्याचा अर्थ धार्मिक भावनांचा विरोध असा होत नाही. सार्वजनिक शांतता आणि आपल्या कायदेशीर हक्कांचे संरक्षण करण्यासाठी प्रशासनाकडे दाद मागणे हा नागरिकांचा अधिकार आहे. त्याचवेळी तक्रारींची तत्काळ दखल घेऊन योग्य कारवाई करणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. उत्सव आयोजकांनीही स्वयंशिस्तीचा मार्ग स्वीकारला पाहिजे. पोलिसांनी प्रत्येक ठिकाणी उभे राहून नियम पाळायला लावण्याची वेळ येऊ नये. धार्मिक कार्यक्रम अधिक अर्थपूर्ण करण्यासाठी सांस्कृतिक, सामाजिक आणि प्रबोधनात्मक उपक्रमांना प्राधान्य दिले, तर उत्सवाचा आनंदही टिकेल आणि नागरिकांची शांतताही अबाधित राहील. सण साजरा करण्याचा अधिकार आणि शांततेत जगण्याचा अधिकार हे परस्परविरोधी नाहीत. नियोजन, स्वयंशिस्त आणि कायद्याची निष्पक्ष अंमलबजावणी यामुळे दोन्ही गोष्टी शक्य आहेत. प्रश्न उत्सव बंद करण्याचा नाही; उत्सवाची पद्धत बदलण्याचा आहे. धर्माच्या नावाखाली 'आवाजाचे' राजकारण नको. श्रद्धेला विवेकाची जोड हवी. पोलिसांनी नियमभंग करणाऱ्यांवर कारवाई करण्याची हिंमत दाखवावी आणि आयोजकांनीही कायद्याचा सन्मान करावा. श्रद्धेचा आवाज मनात असतो; तो दुसऱ्याच्या कानठळ्या बसवून सिद्ध करण्याची गरज नाही.

# प्रत्येक तारखेतून घडते वकिली!

## तयारी, संघर्ष आणि संयमातून न्यायालयीन आत्मविश्वासाची वाटचाल

**कोर्टात उभे राहण्याचा आत्मविश्वास केवळ अनुभवाच्या वर्षांनी येत नाही; तो प्रत्येक केसच्या तयारीतून, प्रत्येक युक्तिवादातून आणि प्रत्येक संघर्षातून घडत जातो. न्यायालयातील माझ्या पहिल्या दिवसापासून आजपर्यंतची प्रत्येक तारीख माझ्यासाठी नवा धडा ठरली आहे. कोर्टाच्या प्रत्येक तारखेसोबत केवळ अनुभव आणि आत्मविश्वास वाढत गेला नाही, तर वकिली क्षेत्रातील प्रत्येक संघर्षाने माझ्यातील 'वकील'ही घडत गेला. सुरुवातीच्या काळात न्यायालयीन वातावरण, केसची तयारी, युक्तिवादाची धडपड आणि वरिष्ठांकडून शिकण्याची प्रक्रिया यामधून अनेक गोष्टी नव्याने समजत गेल्या. हातात घेतलेली पहिली फाईल आणि आज हाताळल्या जाणाऱ्या प्रकरणांमध्ये मोठा फरक असला, तरी शिकण्याची प्रक्रिया मात्र आजही तितकीच जिवंत आहे.**

वकिलीमध्ये केवळ कायद्याचे पुस्तकातील ज्ञान पुरेसे नसते. प्रकरणातील तथ्यांचा बारकाईने अभ्यास, संबंधित कायद्याच्या तरतुदी, न्यायनिर्णयांचा संदर्भ, तर्कशक्ती आणि परिस्थितीचे योग्य वेळी विश्लेषण करण्याची क्षमता या सगळ्यांचा समन्वय साधावा लागतो. न्यायालयात आत्मविश्वासाने बोलण्यासाठी आधी स्वतःची तयारी पक्की असावी लागते. त्यामुळे आत्मविश्वास हा बोलण्यातून नव्हे, तर तयारीतून निर्माण होतो, हे न्यायालयीन अनुभवातून प्रकर्षाने जाणवते.

युक्तिवाद करणे महत्त्वाचे आहेच; पण न्यायालयात 'ऐकणे' हीदेखील तितकीच प्रभावी कला आहे. न्यायालयाचे निरीक्षण, समोरच्या वकिलाचे म्हणणे आणि प्रकरणातील बदलते संदर्भ समजून घेतल्याशिवाय प्रभावी युक्तिवाद करता येत नाही. प्रत्येक केस आपल्याला काहीतरी शिकवते. एखादा युक्तिवाद अपेक्षेप्रमाणे यशस्वी झाला नाही, तरी त्यातून पुढील प्रकरणासाठी महत्त्वाचा अनुभव मिळतो.



**ॲड. अश्विनी बोगम**
ॲडव्होकेट, लिगल कन्सल्टंट व सायकोलॉजी कौन्सिलर
पुणे शिवाजीनगर जिल्हा, सत्र व कौटुंबिक न्यायालय

महिला वकील म्हणून व्यावसायिक आणि वैयक्तिक आयुष्याचा समतोल साधताना अनेक आव्हानांना सामोरे जावे लागते. न्यायालयीन व्यवसायात वेळेचे बंधन, सततची तयारी, क्लायंटच्या अपेक्षा आणि प्रकरणांची जबाबदारी या सगळ्यांबरोबर वैयक्तिक आयुष्यही सांभाळावे लागते. मात्र, प्रत्येक आव्हान हे स्वतःची क्षमता सिद्ध करण्याची संधी असते. त्या संधीचे रूपांतर सामर्थ्यात करण्यासाठी आत्मविश्वास, सातत्य आणि संयम आवश्यक असतो. स्त्री म्हणून नव्हे, तर सक्षम व्यावसायिक म्हणून स्वतःची ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न प्रत्येक टप्प्यावर महत्त्वाचा ठरतो.

वकिलीचा खरा अर्थ केवळ न्यायालयात उभे राहून कायद्याच्या कलमांचा आधार घेत युक्तिवाद करणे इतकाच मर्यादित नाही. समाजातील एखाद्या व्यक्तीवर अन्याय झाला असेल, तर त्याला त्याचे हक्क समजावून सांगणे, कायद्याचा योग्य मार्ग दाखवणे आणि न्याय मिळवून देण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करणे, ही वकिलीची खरी सामाजिक जबाबदारी आहे. अनेक सामान्य नागरिकांना कायद्याची भीती वाटते किंवा कायदेशीर प्रक्रिया अत्यंत गुंतागुंतीची वाटते. अशा वेळी कायदा त्यांच्यासाठी सोप्या भाषेत समजावून सांगणे आवश्यक आहे. याच विचारातून न्यायालयीन कामाबरोबरच कायदेविषयक जनजागृती करण्याचा प्रयत्न करते. सोशल मीडियाच्या माध्यमातून कायद्याच्या विविध विषयांवर लेखन करताना न्यायालयातील प्रत्यक्ष अनुभव आणि कायद्याच्या तरतुदी सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न असतो. कायदा हा केवळ न्यायालयाच्या चार भिंतींमध्ये बंदिस्त न राहता समाजातील प्रत्येक व्यक्तीला समजला पाहिजे, असा माझा ठाम विश्वास आहे.

कायद्याच्या शिक्षणाच्या गुणवत्तेकडेही आज गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. कायद्याची पदवी मिळविणे हा वकिलीच्या प्रवासाचा शेवट नसून सुरुवात आहे. विद्यार्थ्यांनी कायद्याचे सखोल ज्ञान, न्यायालयीन प्रक्रिया, संशोधनाची पद्धत आणि व्यावहारिक कौशल्य आत्मसात केले पाहिजे. केवळ परीक्षेत चांगले गुण मिळविण्यापेक्षा गुणवत्तापूर्ण आणि समाजाभिमुख वकील घडणे ही काळाची गरज आहे. कारण वकील हा न्यायव्यवस्थेचा केवळ भाग नसून नागरिक आणि न्यायसंस्था यांच्यातील महत्त्वाचा दुवा आहे. या प्रवासात प्रत्येक गोष्ट मनासारखी घडतेच असे नाही. अनेकदा मोठ्या प्रयत्नांनंतरही अपेक्षित परिणाम मिळत नाही. काही प्रकरणांत निराशा येते, काही निर्णय मनाविरुद्ध जातात; परंतु अशा प्रसंगांत धैर्य आणि संयम सोडून चालत नाही. वकिली हा दीर्घ पल्ल्याचा प्रवास आहे. एका निकालाने यश किंवा अपयश ठरत नाही. प्रत्येक अनुभव पुढच्या लढाईसाठी अधिक सक्षम करत असतो.

कायद्याच्या क्षेत्रात माझे येणे हे एका अर्थाने 'ॲक्सिडेंटल एंट्री' म्हणता येईल. मात्र, आज मागे वळून पाहताना हा केवळ योगायोग नव्हता, तर माझ्यासाठी नियतीने निवडलेला मार्ग असल्याची जाणीव होते. पहिल्या दिवशी न्यायालयात प्रवेश करताना वाटलेली भीती, पहिली फाईल हातात घेतानाची धडपड आणि स्वतःला सिद्ध करण्याची धडपड आज अनुभवात बदलली आहे. कायद्याचे ज्ञान, न्यायालयीन शिस्त, सहकाऱ्यांकडून मिळालेले अनुभव, क्लायंटच्या अपेक्षा आणि विविध प्रकरणांतील संघर्ष या सगळ्यांनी माझ्या वकिलीला आकार दिला. अजूनही प्रत्येक केससमोर नव्याने तयारी करावी लागते, नव्याने विचार करावा लागतो आणि स्वतःच्या भूमिकेची कसोटी घ्यावी लागते.

वकिलीचा प्रवास म्हणजे केवळ न्यायालयात बोलण्याचा प्रवास नाही; तो सतत शिकण्याचा, स्वतःला तपासण्याचा आणि अन्यायाविरुद्ध कायद्याच्या माध्यमातून उभे राहण्याचा प्रवास आहे. प्रत्येक तारीख संपते; पण त्या तारखेतून मिळालेला धडा पुढच्या लढाईत सोबत राहतो. म्हणूनच माझ्यासाठी कोर्टातील प्रत्येक दिवस हा अजूनही एक नवा धडा आहे आणि शिकण्याचा हा प्रवास पुढेही असाच सुरू राहणार आहे. ■■■

# बार कौन्सिलने आत्मपरीक्षण करावे!

## न्यायव्यवस्था सक्षम ठेवण्यासाठी वकिलांनी एकसंध आवाज उठवावा : न्या. बी. व्ही. नागरत्ना

डेवलप्ड नेशन्स लॉ न्यूज
developednationslaw@gmail.com

**नवी दिल्ली :** व्यावसायिक नीतिमत्ता, नैतिकता आणि वकिलीतील गुणवत्ता जपण्यात बार कौन्सिलची भूमिका महत्त्वाची असून, केंद्रीय तसेच राज्य बार कौन्सिलने आपल्या कार्यपद्धतीचे आत्मपरीक्षण करावे, असे आवाहन सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना यांनी केले.

नवी दिल्ली येथील नॅशनल लॉ युनिव्हर्सिटीच्या १३व्या दीक्षान्त समारंभात त्या बोलत होत्या. बार कौन्सिलला तिच्या सदस्यांचाच आदर मिळत नसेल, तर ही कायदे व्यवसायासाठी चांगली बाब नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. न्यायव्यवस्थेसमोरील प्रलंबित खटले, विलंब, वाढता खर्च आणि अनिश्चितता यांचा उल्लेख करून न्या. नागरत्ना यांनी या परिस्थितीत बारने न्यायव्यवस्था सक्षम ठेवण्यासाठी एकसंध भूमिका मांडण्याची गरज व्यक्त केली. न्यायदानाची प्रक्रिया अधिक प्रभावी आणि विश्वासार्ह ठेवण्यासाठी वकिलांनी व्यावसायिक शिस्त, नैतिकता आणि गुणवत्तेला सर्वोच्च प्राधान्य द्यावे, असेही त्यांनी नमूद केले.

## ‘कायद्याच्या वाटेवरून विकसित राष्ट्राकडे!’

# न्यासात सत्ता नव्हे, कायद्याचे अधिष्ठान!

धार्मिक आणि सामाजिक संस्था या केवळ नोंदणीकृत संस्था नसतात; त्या समाजाच्या श्रद्धा, विश्वास आणि सामूहिक योगदानाचे विश्वस्त असतात. त्यामुळे त्यांच्या कारभारात पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि कायद्याचे पालन ही केवळ प्रशासकीय औपचारिकता नसून जनविश्वासाची मूलभूत अट ठरते. श्रीक्षेत्र आळंदी येथील पवन मावळ वारकरी समाज संस्थेबाबत संयुक्त धर्मादाय आयुक्तांनी दिलेला आदेश याच वास्तवाची आठवण करून देतो.

महाराष्ट्र सार्वजनिक न्यास अधिनियम, १९५० च्या कलम ४१ई अंतर्गत दाखल झालेल्या अर्जात संस्थेचे बँक खाते नवनिर्वाचित अध्यक्षाला चालविण्यापासून रोखण्याची मागणी करण्यात आली होती. निधीच्या गैरवापरासह काही गंभीर आरोपही करण्यात आले. मात्र, उपलब्ध कागदपत्रे आणि दोन्ही बाजूंच्या भूमिकांचा विचार केल्यानंतर प्रकरणाचा केंद्रबिंदू संस्थेची निवडणूक प्रक्रिया आणि अर्जदारांचे त्यानंतरचे आचरण यावर आला.

२ मार्च २०२५ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत नवीन व्यवस्थापन समितीची निवड झाल्याचे नोंदींतून समोर आले. त्यानंतर संबंधित बदल अहवाल धर्मादाय आयुक्त कार्यालयात दाखल करण्यात आला होता. विशेष म्हणजे, जुन्या व्यवस्थापनाकडील ९ लाख ८० हजार ४३० रुपयांची रक्कम नव्या अध्यक्षांकडे देण्यात आली आणि ती संस्थेच्या बँक खात्यात जमा झाली. बँकेनेही आवश्यक ठराव, केवायसी कागदपत्रे आणि इतर नोंदी तपासून खात्यावरील स्वाक्षरी अधिकारात बदल केला.

याच पार्श्वभूमीवर संयुक्त धर्मादाय आयुक्तांनी अर्जदारांनी काही महत्त्वाची तथ्ये अर्जात नमूद केली नसल्याचे निरीक्षण नोंदविले. निवडणूक झाल्याची माहिती, त्यानंतरची संमती आणि संबंधित कागदपत्रांतील नोंदी या बाबी प्रकरणाच्या मुळाशी जात असल्याचे आदेशात स्पष्ट करण्यात आले. न्यायालयीन प्रक्रियेत एखादी महत्त्वाची वस्तुस्थिती दडवून दिलासा मागणे हे पक्षकाराच्या विश्वासार्हतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण करणारे ठरते.

या आदेशाचा व्यापक अर्थ यापेक्षा महत्त्वाचा आहे. धार्मिक अथवा सामाजिक संस्थेचा कारभार काही व्यक्तींच्या वैयक्तिक अधिकाराचा विषय असू शकत नाही. सभासद, देणगीदार आणि समाजाकडून मिळालेला निधी हा सार्वजनिक विश्वासाचा भाग असतो. त्यामुळे निवडणुका, ठराव, आर्थिक व्यवहार, बँक खाते आणि बदल अहवाल यामध्ये स्पष्टता असणे आवश्यक आहे.

संस्थेच्या व्यवस्थापनात मतभेद होणे स्वाभाविक आहे. मात्र, मतभेदांचे निराकरण संस्थेच्या नियमांनुसार आणि कायदेशीर प्रक्रियेतून झाले पाहिजे. एकदा घेतलेला निर्णय किंवा पार पडलेली निवडणूक नंतरच्या सोयीप्रमाणे नाकारण्याची प्रवृत्ती संस्थेच्या विश्वासार्हतेला बाधा आणू शकते. संस्थात्मक लोकशाहीची खरी कसोटी निवडणूक घेण्यात नसून तिच्या निकालाचा नियमबद्ध स्वीकार करण्यात आहे.

धर्मादाय संस्थांबाबत कायद्याने निर्माण केलेली यंत्रणा याच कारणासाठी महत्त्वाची आहे. धर्मादाय आयुक्तांचे कार्यालय हे केवळ कागदपत्रांची नोंद ठेवणारे प्रशासकीय केंद्र नसून सार्वजनिक न्यासांच्या मालमत्ता आणि कारभाराचे संरक्षण करण्याची जबाबदारी असलेली संस्था आहे. त्याच वेळी, या अधिकारांचा वापर करताना वस्तुनिष्ठ कागदपत्रे, नैसर्गिक न्याय आणि कायदेशीर प्रक्रिया यांना सर्वोच्च महत्त्व असते.

या प्रकरणात अर्ज फेटाळताना संस्थेची मालमत्ता किंवा निधी धोक्यात असल्याचे अर्जदारांना सिद्ध करता आले नसल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे हा निकाल केवळ एका बँक खात्याच्या व्यवहारापुरता मर्यादित मानता येणार नाही. संस्थेच्या कारभारात अधिकारापेक्षा नियम आणि व्यक्तीपेक्षा संस्था महत्त्वाची असते, हा त्याचा मूलभूत संदेश आहे.

महाराष्ट्रात असंख्य धार्मिक, शैक्षणिक आणि सामाजिक न्यास कार्यरत आहेत. त्यांच्या माध्यमातून समाजाच्या विविध घटकांना मदत केली जाते. या संस्थांकडे जमा होणारा निधी हा देणगीदारांच्या विश्वासातून निर्माण होतो. त्यामुळे त्या निधीचा प्रत्येक व्यवहार प्रश्नांच्या पलीकडे राहील, अशी पारदर्शक व्यवस्था उभी करणे ही व्यवस्थापनाची नैतिक आणि कायदेशीर जबाबदारी आहे.

विश्वास हा संस्थेचा सर्वांत मोठा भांडवल असतो. तो एकदा ढासळला की कोणतीही धार्मिक परंपरा, सामाजिक प्रतिष्ठा किंवा संस्थेचे नाव त्याची भरपाई करू शकत नाही. म्हणूनच श्रद्धेच्या संस्थांना श्रद्धेबरोबरच कायद्याचे अधिष्ठान आवश्यक आहे.

पवन मावळ वारकरी समाज संस्थेच्या प्रकरणातील आदेशातून मिळणारा धडा स्पष्ट आहे. संस्थेतील मतभेद असोत किंवा नेतृत्वबदल, त्यावर अंतिम तोडगा व्यक्तीगत प्रभावातून नव्हे, तर नियम, कागदपत्रे आणि कायदेशीर प्रक्रियेतूनच निघाला पाहिजे. कारण सार्वजनिक न्यास हा कोणत्याही व्यक्तीचा खासगी वारसा नसतो; तो समाजाचा विश्वास असतो.

# गणेशोत्सव आणि कायद्याची लक्ष्मणरेषा

## लोकमान्य टिळकांच्या सामाजिक जागृतीपासून आजच्या उत्सवसंस्कृतीपर्यंत; श्रद्धा, स्वातंत्र्य आणि सार्वजनिक शिस्तीचा बदलता प्रवास

गणपतीची आरती सुरू झाली की वातावरणात भक्तीचे सूर मिसळतात. घराघरांतला गणपती सार्वजनिक झाला आणि त्या सार्वजनिकतेला सामाजिक परिवर्तनाचे रूप मिळाले, तो काळ होता लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांचा. आज शंभराहून अधिक वर्षांनंतर गणेशोत्सवाचे स्वरूप प्रचंड विस्तारले आहे. मंडप भव्य झाले, रोषणाई आली, देखावे बदलले, तंत्रज्ञान उत्सवात उतरले; पण या बदलत्या प्रवासात एक प्रश्न अधिक महत्त्वाचा झाला आहे—श्रद्धेला कायद्याची लक्ष्मणरेषा कुठे आखायची आणि उत्सवाच्या स्वातंत्र्याला इतरांच्या अधिकारांची जाणीव कुठे जोडायची?

**✦ टिळकांचा गणपती : देवापासून समाजजागृतीपर्यंत**

गणेशपूजेची परंपरा महाराष्ट्रात शतकानुशतके आहे. मात्र, सार्वजनिक गणेशोत्सवाला व्यापक सामाजिक आणि सार्वजनिक स्वरूप देण्याचे श्रेय लोकमान्य टिळकांना जाते. ब्रिटिश राजवटीत सार्वजनिक राजकीय सभा आणि संघटनांवर निर्बंध असताना गणेशोत्सव हा समाजाला एकत्र आणण्याचा प्रभावी मार्ग ठरला.

गणेश मंडप हे त्या काळात केवळ पूजास्थान नव्हते. व्याख्याने, कीर्तन, पोवाडे, नाटके, सामाजिक चर्चा आणि राष्ट्रीय विचार यांमधून लोकजागृती केली जात होती. विविध सामाजिक स्तरांतील लोकांना एका सार्वजनिक व्यासपीठावर आणण्याचे काम या उत्सवाने केले. म्हणून टिळकांचा गणेशोत्सव समजून घेताना त्याची भव्यता नव्हे, तर त्याची सामाजिक भूमिका समजून घेणे महत्त्वाचे आहे.

**✦ शंभर वर्षांत उत्सवाचे बदललेले रूप**

टिळकांच्या काळातील गणेशोत्सव आणि आजचा गणेशोत्सव यांच्यात मोठा फरक आहे. पूर्वी मंडप, सजावट आणि मिरवणुकीला मर्यादा होत्या. आज डिजिटल स्क्रीन, लेझर शो, भव्य देखावे, प्रचंड ध्वनिवर्धक व्यवस्था आणि सोशल मीडियावरील प्रसिद्धीने उत्सवाचे स्वरूप बदलले आहे.

या बदलाला विरोध करण्याचे कारण नाही. संस्कृती स्थिर नसते; ती काळानुसार बदलत राहते. मात्र, परंपरेचे आधुनिकीकरण आणि परंपरेच्या नावाखाली कायद्याचे उल्लंघन यात मूलभूत फरक आहे. गणेशोत्सव मोठा व्हावा; पण त्याचबरोबर नागरिकांची गैरसोय मोठी होऊ नये. मिरवणूक भव्य असावी; पण रुग्णवाहिकेचा मार्ग बंद होऊ नये. संगीत असावे; पण त्याचा आवाज दुसऱ्याच्या आरोग्यावर आघात करणारा नसावा. हीच आधुनिक उत्सवसंस्कृतीची खरी कसोटी आहे.

घटनात्मक अधिकार अमर्याद नाहीत

भारतीय राज्यघटना धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार नागरिकांना देते. मात्र, कोणताही मूलभूत अधिकार निरंकुश नसतो. सार्वजनिक सुव्यवस्था, आरोग्य आणि इतरांच्या अधिकारांचा विचार संविधानिक व्यवस्थेत केला जातो.

म्हणूनच ‘हा धार्मिक उत्सव आहे’ एवढे कारण देऊन कायद्यापासून सूट मागता येत नाही. धार्मिक स्वातंत्र्य आणि सार्वजनिक सुव्यवस्था यांचा समतोल राखणे हे लोकशाहीचे मूलभूत तत्त्व आहे. गणपतीची आरती करणाऱ्या व्यक्तीला श्रद्धेचे स्वातंत्र्य आहे; त्याच वेळी त्या परिसरातील ज्येष्ठ नागरिकाला शांततेत राहण्याचा, विद्यार्थ्याला अभ्यास करण्याचा आणि रुग्णाला विश्रांती घेण्याचा अधिकारही आहे. एका नागरिकाच्या अधिकाराचा विस्तार दुसऱ्याच्या अधिकारांवर अतिक्रमण करणारा ठरू नये, हीच संविधानिक समतोलाची अपेक्षा आहे.

**✦ सर्वोच्च न्यायालयाची स्पष्ट भूमिका**

ध्वनिप्रदूषणाच्या प्रश्नावर सर्वोच्च न्यायालयाने अनेक वर्षांपूर्वीच महत्त्वाची भूमिका स्पष्ट केली आहे. धार्मिक कारण सांगून इतरांच्या शांततेत अडथळा निर्माण करणाऱ्या आवाजाला अमर्याद संरक्षण मिळू



डॉ. अशोक बालगुडे
निवासी संपादक

शकत नाही. ध्वनिप्रदूषण हा केवळ ‘आवाजाचा’ प्रश्न नाही. तो आरोग्य, झोप, शिक्षण आणि सार्वजनिक जीवनाच्या गुणवत्तेशी संबंधित आहे.

यातून एक महत्त्वाचा संदेश मिळतो—न्यायालय उत्सवाच्या विरोधात नाही; न्यायालय कायद्याबाहेरच्या उत्सवाच्या विरोधात आहे.

**✦ जगभरातील उत्सव आपल्याला काय शिकवतात?**

गणेशोत्सवाकडे केवळ भारतीय धार्मिक परंपरा म्हणून न पाहता जगातील उत्सवसंस्कृतीच्या संदर्भातही पाहण्याची गरज आहे. जगभरातील अनेक पारंपरिक उत्सवांना सांस्कृतिक वारशाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. मात्र, आधुनिक काळात गर्दी, व्यापारीकरण, पर्यावरणीय परिणाम आणि सार्वजनिक व्यवस्थापन ही त्यांच्यासमोरील नवी आव्हाने आहेत.

भारताच्या कुंभमेळ्यापासून ब्राझीलमधील कार्निव्हलपर्यंत अनेक मोठ्या उत्सवांमधून एक धडा स्पष्ट होतो—उत्सव जितका मोठा, तितकी सार्वजनिक व्यवस्थापनाची जबाबदारीही मोठी.

**✦ मंडळांनी ‘उत्सव’ नव्हे, ‘उपक्रम’ व्हावे**

लोकमान्य टिळकांच्या विचारांचा खरा वारसा पुढे न्यायचा असेल तर गणेश मंडळांनी स्वतःकडे केवळ उत्सव आयोजक म्हणून न पाहता सामाजिक संस्थेच्या भूमिकेत पाहिले पाहिजे. रक्तदान, आरोग्य तपासणी, विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत, व्यसनमुक्ती, महिला सुरक्षा, वाहतूक शिस्त, सायबर गुन्ह्यांबाबत जनजागृती, कायदेविषयक मार्गदर्शन आणि पर्यावरण संवर्धन अशा उपक्रमांमधून गणेशोत्सवाला सामाजिक अर्थ प्राप्त होऊ शकतो.

आज सोशल मीडिया हे लोकजागृतीचे प्रभावी माध्यम आहे. ज्या माध्यमातून मंडळे स्वतःची प्रसिद्धी करतात, त्याच माध्यमातून संविधानिक कर्तव्ये, नागरिकांचे अधिकार आणि कायद्याचे पालन याबाबत जनजागृतीही करता येऊ शकते.

**✦ पर्यावरणाचाही विचार हवा**

गणेशोत्सव आणि पर्यावरण यांचा संबंध आता केवळ नैतिकतेपुरता राहिलेला नाही. जलप्रदूषण, प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती, रासायनिक रंग, प्लास्टिकचा वापर आणि निर्माल्य व्यवस्थापन यांसारख्या प्रश्नांना पर्यावरणीय कायद्याची जोड आहे.

शाडूच्या मूर्ती, नैसर्गिक रंग, कृत्रिम किंवा घरगुती विसर्जन व्यवस्था, निर्माल्याचे योग्य व्यवस्थापन आणि प्लास्टिकमुक्त उत्सव यांचा स्वीकार हा भावी पिढ्यांप्रती असलेल्या सामाजिक जबाबदारीचा भाग आहे.

**✦ कायद्याची लक्ष्मणरेषा का आवश्यक?**

‘लक्ष्मणरेषा’ हा शब्द बंधनाचा वाटू शकतो. पण लोकशाहीमध्ये कायदा हा उत्सवाचा शत्रू नसतो; तो सर्वांच्या स्वातंत्र्याचा संरक्षक असतो.

कायद्याची मर्यादा नसलेले स्वातंत्र्य शेवटी दुसऱ्याच्या स्वातंत्र्यावर आघात करू शकते. म्हणून उत्सवाला शिस्त आवश्यक आहे. श्रद्धेला विवेकाची जोड आवश्यक आहे. अधिकाराला कर्तव्याची साथ आवश्यक आहे.

गणेशोत्सवाच्या काळात पोलीस, महापालिका आणि प्रशासनावर मोठी जबाबदारी असते. मात्र, प्रत्येक नियमाची अंमलबजावणी केवळ प्रशासनाने करावी, अशी अपेक्षा करून चालणार नाही. मंडळे आणि नागरिकांनी स्वयंशिस्त स्वीकारली तर प्रशासनावरील ताणही कमी होईल.

**✦ टिळकांचा वारसा कोणता?**

लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सवाला समाजजागृतीचे माध्यम केले. आज आपल्याकडे त्या काळापेक्षा अधिक साधने आहेत—डिजिटल माध्यमे आहेत, शिक्षणाचा विस्तार आहे, कायदेविषयक जागरूकता आहे आणि लोकशाही संस्था आहेत. मग प्रश्न असा आहे की, आपण टिळकांच्या गणेशोत्सवाला पुढे नेतो आहोत की त्याच्या केवळ बाह्य रूपाची नक्कल करतो आहोत?

टिळकांच्या काळात उत्सवाने समाजाला प्रश्न विचारायला शिकवले. आजच्या उत्सवाने समाजाला स्वतःला प्रश्न विचारायला शिकवणे गरजेचे आहे.

माझा गणपती किती मोठा? माझा मंडप किती भव्य? माझ्या मिरवणुकीचा आवाज किती मोठा? या प्रश्नांपेक्षा माझ्या उत्सवामुळे समाजाला काय मिळाले, किती गरजूंना मदत झाली, किती लोकांमध्ये कायद्याची जाणीव निर्माण झाली आणि किती नागरिकांचे जीवन अधिक चांगले झाले, हे प्रश्न अधिक महत्त्वाचे ठरले पाहिजेत.

**✦ श्रद्धा राहू द्या; विवेकही जागा राहू द्या**

गणेश म्हणजे बुद्धी आणि विवेकाचे प्रतीक. त्यामुळे गणेशोत्सव साजरा करताना विवेक बाजूला ठेवणे हीच मोठी विसंगती ठरेल.

उत्सवावर बंधने आणणे हा उद्देश नाही. उलट उत्सवाला अधिक सुसंस्कृत, समावेशक, पर्यावरणपूरक आणि कायदेसन्मत बनवणे हा उद्देश असला पाहिजे. लोकमान्य टिळकांच्या काळात गणेशोत्सवाने परकीय सत्तेविरुद्ध सामाजिक जागृती केली. आजच्या काळात त्याच गणेशोत्सवाने अज्ञान, प्रदूषण, असंवेदनशीलता आणि कायद्याच्या अनास्थेविरुद्ध जागृती करण्याची गरज आहे. कारण काळ बदलला आहे; आव्हाने बदलली आहेत; पण समाजाला एकत्र आणण्याची गणेशोत्सवाची ताकद आजही तितकीच मोठी आहे.

म्हणूनच आजच्या गणेशोत्सवाची खरी कसोटी मूर्तीच्या उंचीत, सजावटीच्या भव्यतेत किंवा ध्वनीच्या तीव्रतेत नाही. ती आहे—कायद्याचा सन्मान, नागरिकांच्या अधिकारांची जाणीव आणि समाजहिताची बांधिलकी.

लोकमान्यांनी दिलेला उत्सवाचा वारसा जपायचा असेल, तर श्रद्धेच्या हातात कायद्याचा दिवा आणि उत्साहाच्या सोबतीला विवेकाची मशाल द्यावी लागेल. कारण गणेशोत्सवाची खरी लक्ष्मणरेषा कायदा आखतो; पण ती ओलांडायची की जपायची, हे आपल्या सामूहिक विवेकावर अवलंबून आहे.

# भारताचे महान कायदेतज्ज्ञ : के. के. वेणुगोपाल

## अनपेक्षित सुरुवातीपासून संविधाननिष्ठ विधीप्रवासापर्यंत

कायद्याच्या क्षेत्रात येणे हा के. के. वेणुगोपाल यांचा पूर्वनियोजित निर्णय नव्हता. मद्रास ख्रिश्चन कॉलेजमधील भौतिकशास्त्राच्या परीक्षेतील अपयशानंतर त्यांच्या कारकिर्दीला अनपेक्षित वळण मिळाले. प्रख्यात बॅरिस्टर एम. के. नाम्बियार यांच्या मार्गदर्शनाने त्यांनी बेळगावच्या राजा लखमगौडा लॉ कॉलेजमधून कायद्याचा अभ्यास सुरू केला. पुढे हाच निर्णय भारतीय विधी क्षेत्रातील प्रदीर्घ आणि प्रभावी कारकिर्दीचा पाया ठरला.

'An Accidental Lawyer: My Adventures in Law and Life' या आत्मचरित्रात वेणुगोपाल यांनी आपल्या विधीप्रवेशाची ही कहाणी मांडली आहे. सुरुवात अनपेक्षित असली तरी कायद्याच्या क्षेत्रात प्रवेश केल्यानंतर त्यांनी अभ्यास, तयारी आणि न्यायालयीन अनुभव यांना सातत्याने महत्त्व दिले. त्यांच्या कारकिर्दीचा हा पैलू आजच्या विधी विद्यार्थ्यांसाठी विशेष महत्त्वाचा आहे.

मद्रासमधील कनिष्ठ न्यायालयांत मोटार वाहन अपघात आणि दिवाणी दाव्यांपासून त्यांच्या वकिलीची सुरुवात झाली. सर्वोच्च न्यायालयातील घटनात्मक प्रकरणांपर्यंत पोहोचेपर्यंत कनिष्ठ न्यायालयांतील हा अनुभव त्यांच्या विधीविषयक जडणघडणीचा महत्त्वाचा भाग ठरला. प्रकरणातील तथ्यांचा सखोल अभ्यास, कायद्याचा व्यावहारिक अन्वयार्थ आणि न्यायालयासमोर मुद्देसूद मांडणी ही त्यांच्या कामाची वैशिष्ट्ये मानली गेली.



ॲड. पल्लवी काळे
मार्गदर्शक, 'डेवलप्ड नेशन्स लॉ न्यूज '

भारतीय संविधानाच्या वाटचालीतील अनेक महत्त्वाच्या टप्प्यांशी त्यांची वकिली जोडली गेली. आणीबाणीचा काळ, तामिळनाडूतील राजकीय घडामोडी, १९८४ च्या शीखविरोधी दंगलीशी संबंधित न्यायालयीन प्रकरणे आणि बाबरी मशीद वाद यांसारख्या संवेदनशील विषयांमध्ये त्यांनी न्यायालयीन भूमिका बजावली. अशा प्रकरणांमध्ये कायद्याच्या तरतुदींबरोबरच संविधानातील मूलभूत मूल्यांचे भान महत्त्वाचे ठरते.

भारताचे १५ वे ॲटर्नी जनरल म्हणून वेणुगोपाल यांनी केंद्र सरकारचे सर्वोच्च कायदेविषयक प्रतिनिधित्व केले. या पदावर सरकारची भूमिका न्यायालयासमोर मांडतानाच संविधान आणि न्यायालयाप्रती असलेली जबाबदारीही महत्त्वाची असते. कार्यकारी सत्तेचे प्रतिनिधित्व आणि घटनात्मक चौकटीचा आदर यांचा समतोल राखणे, हा त्यांच्या भूमिकेतील महत्त्वाचा पैलू होता. वेणुगोपाल यांच्या कारकिर्दीकडे पाहताना वकिलीच्या बदलत्या स्वरूपाचाही विचार करावा लागतो. आज कायद्याची माहिती डिजिटल माध्यमांतून सहज उपलब्ध आहे. मात्र, माहिती मिळविणे आणि तिचे कायदेशीर विश्लेषण करणे यात मोठा फरक आहे. न्यायालयीन युक्तिवादासाठी तथ्यांचा अभ्यास, संबंधित कायदे, पूर्वनिर्णय आणि घटनात्मक तत्त्वे यांचा सखोल विचार आवश्यक असतो. वेणुगोपाल यांची कारकीर्द या मूलभूत प्रक्रियेचे महत्त्व अधोरेखित करते. नवोदित वकिलांसाठी त्यांच्या प्रवासातील आणखी एक धडा महत्त्वाचा आहे. वकिली ही केवळ प्रभावी वक्तृत्वाची कला नाही. ती न्यायव्यवस्थेवरील विश्वासाशी जोडलेली व्यावसायिक जबाबदारी आहे. विरोधी पक्षाशी मतभेद असले तरी न्यायालयीन शिष्टाचार, संयम आणि तथ्यांवरील पकड कायम ठेवणे आवश्यक असते. न्यायालयाला प्रभावित करण्यासाठी आवाजापेक्षा युक्तिवादाची गुणवत्ता महत्त्वाची असते. काळ्या कोटाच्या पलीकडेही वेणुगोपाल यांचे व्यक्तिमत्त्व व्यापक होते. वाचन, दुर्मीळ पुस्तकांचा संग्रह, गिर्यारोहण आणि सामाजिक कार्य यांसारख्या विविध क्षेत्रांत त्यांची रुची होती. विधी क्षेत्रातील दीर्घ कारकिर्दीसोबत वैचारिक समृद्धी आणि सामाजिक जाणीव जपण्याचा त्यांचा प्रयत्न उल्लेखनीय ठरतो.

के. के. वेणुगोपाल यांचा विधी क्षेत्रातील प्रवेश अनपेक्षित होता; मात्र त्यानंतरची वाटचाल ही सातत्यपूर्ण अभ्यास, अनुभव, व्यावसायिक नैतिकता आणि संविधाननिष्ठेची होती. त्यामुळे त्यांचा जीवनप्रवास केवळ एका ज्येष्ठ वकिलाची यशोगाथा न राहता, कायद्याच्या क्षेत्रात प्रवेश करणाऱ्या नव्या पिढीसाठी एक महत्त्वाचा धडा ठरतो. संधी अनपेक्षितपणे मिळू शकते; परंतु तिचे यशस्वी कारकिर्दीत रूपांतर करण्यासाठी अभ्यास, परिश्रम, नैतिकता आणि न्यायाप्रती निष्ठा आवश्यक असते. के. के. वेणुगोपाल यांचा प्रदीर्घ विधीप्रवास याच मूल्यांची साक्ष देतो. ■■■

# निर्भीड वकिलीचा आदर्श : इंदिरा जयसिंग

कायद्याच्या क्षेत्रात यश मिळवण्यासाठी केवळ पदवी किंवा वक्तृत्व पुरेसे नसते. सखोल कायदेविषयक अभ्यास, सामाजिक वास्तवाची जाण आणि घटनात्मक मूल्यांप्रती निष्ठा आवश्यक असते. ज्येष्ठ विधिज्ञ इंदिरा जयसिंग यांचा प्रदीर्घ विधीप्रवास या मूल्यांचा आदर्श ठरतो.

मुंबईतील कामगार न्यायालयांपासून त्यांनी वकिलीला सुरुवात केली. कामगार, गिरणी कामगार आणि वंचित घटकांच्या प्रश्नांना त्यांनी न्यायालयीन व्यासपीठ मिळवून दिले. पुढे पदपथावरील रहिवाशांचा उपजीविकेचा अधिकार, महिलांचे वारसा हक्क, पालकत्वातील समानता आणि कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अशा महत्त्वाच्या प्रश्नांवर त्यांनी न्यायालयीन लढे दिले.



ॲड. विशाल काळे
मार्गदर्शक, 'डेवलप्ड नेशन्स लॉ न्यूज '

घटनात्मक अधिकारांकडे व्यापक दृष्टिकोनातून पाहणे हे त्यांच्या वकिलीचे वैशिष्ट्य राहिले. जीवनाचा अधिकार हा केवळ अस्तित्वापुरता मर्यादित नसून त्यात उपजीविकेचाही समावेश होतो, अशी भूमिका त्यांनी मांडली. महिलांच्या हक्कांबाबतही कायद्याच्या पारंपरिक चौकटीला घटनात्मक समानतेच्या कसोटीवर तपासण्याचा प्रयत्न केला.

१९८६ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाने त्यांना ज्येष्ठ विधिज्ञ म्हणून नियुक्त केले. मात्र, प्रतिष्ठेचे स्थान मिळाल्यानंतरही त्यांनी न्यायव्यवस्थेतील प्रक्रियांवर प्रश्न उपस्थित करणे सुरूच ठेवले. २०१७ मध्ये ज्येष्ठ विधिज्ञ नियुक्ती प्रक्रियेतील पारदर्शकतेचा मुद्दा त्यांनी सर्वोच्च न्यायालयासमोर मांडला. या हस्तक्षेपामुळे नियुक्ती प्रक्रियेत वस्तुनिष्ठ निकष आणि पारदर्शकतेबाबत महत्त्वाची चर्चा पुढे आली.

इंदिरा जयसिंग यांच्या कारकिर्दीतून नव्या पिढीतील वकिलांना तीन महत्त्वाचे धडे मिळतात—सखोल अभ्यास, निर्भीड मांडणी आणि घटनात्मक मूल्यांशी निष्ठा. न्यायालयीन वकिली ही केवळ एखादा खटला जिंकण्यापुरती मर्यादित नसून, कायद्याच्या माध्यमातून व्यापक सामाजिक बदल घडविण्याचे साधन ठरू शकते.




निर्भीड वकिली म्हणजे आक्रमकता नव्हे. कायद्याच्या चौकटीत राहून अन्यायकारक रूढींना प्रश्न विचारणे, तथ्यांच्या आधारे भूमिका मांडणे आणि न्यायाच्या मूलभूत तत्त्वांशी तडजोड न करणे हीच तिची खरी ओळख आहे.

इंदिरा जयसिंग यांचा विधीप्रवास त्यामुळे एका ज्येष्ठ महिला विधिज्ञाच्या यशापुरता मर्यादित राहत नाही. कायद्याचा अभ्यास आणि सामाजिक बांधिलकी यांच्या बळावर न्यायालयात स्वतःचे स्थान कसे निर्माण करता येते, याचा तो वस्तुपाठ आहे. ■■■

# राजस्थान उच्च न्यायालयात 'रोस्टर'वरून तणाव; न्यायालयीन स्वशासनाची परीक्षा

## न्या. संदीप मेहतांची मुख्य न्यायमूर्तींकडे तीन पत्रे; प्रशासकीय निर्णयांवर गंभीर आक्षेप

डेवलप्ड नेशन्स
developednationslaw@gmail.com

**नवी दिल्ली :** राजस्थान उच्च न्यायालयातील प्रशासकीय कामकाज आणि 'मास्टर ऑफ द रोस्टर' अधिकारांच्या वापरावरून निर्माण झालेल्या तणावामुळे न्यायालयीन स्वशासनाच्या पारदर्शकतेवर प्रश्न उपस्थित झाले आहेत. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती संदीप मेहता यांनी भारताचे मुख्य न्यायमूर्ती सूर्यकांत यांना २, १० आणि १७ ऑगस्ट रोजी तीन औपचारिक पत्रे पाठवून राजस्थान उच्च न्यायालयाचे कार्यवाहक मुख्य न्यायमूर्ती संजीव प्रकाश शर्मा यांच्या कामकाजाबाबत गंभीर चिंता व्यक्त केल्याचे समोर आले आहे.

महत्त्वाची प्रकरणे नियमित खंडपीठांकडून काढून कार्यवाहक मुख्य न्यायमूर्तींच्या खंडपीठासमोर सूचीबद्ध केली जात असल्याचा आक्षेप पत्रांमध्ये घेण्यात आला आहे. विशेषतः जोधपूर मुख्य आसनाच्या अधिकारक्षेत्रातील प्रकरणे जयपूर येथे सूचीबद्ध करण्याच्या पद्धतीवरही प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे.

कार्यवाहक मुख्य न्यायमूर्तींच्या सुमारे दहा महिन्यांच्या कार्यकाळावरही न्या. मेहता यांनी प्रश्न उपस्थित केला असून, राजस्थान उच्च न्यायालयाला बाहेरील राज्यातील कायमस्वरूपी मुख्य न्यायमूर्ती तातडीने नियुक्त करण्याची मागणी केल्याचे सांगण्यात येते. तसेच जवळपास सर्व न्यायाधीशांना जयपूरमधील परिषदेसाठी नामनिर्देशित केल्याने जोधपूर मुख्य आसनाच्या कामकाजावर परिणाम झाल्याचा मुद्दाही पत्रव्यवहारात मांडण्यात आला आहे.

या पत्रव्यवहाराच्या पार्श्वभूमीवर मुख्य न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी संस्थात्मक शिस्त आणि निर्धारित प्रक्रियेवर भर दिल्याचे सांगण्यात येते. विद्यमान संवैधानिक न्यायाधीशांविरोधातील आरोप सार्वजनिक चर्चेतून नव्हे, तर सक्षम अंतर्गत प्रक्रियेतून तपासले जाणे आवश्यक आहे. संबंधित न्यायमूर्तींना आपले म्हणणे मांडण्याची संधी देणे हे नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वानुसार आवश्यक असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

या प्रकरणाचा सर्वोच्च न्यायालयाचे कोलेजियम अंतर्गत पातळीवर विचार करीत असल्याचे सांगण्यात येते. मुख्य न्यायमूर्तींचे रोस्टरवरील अधिकार, न्यायिक स्वातंत्र्य, प्रशासकीय पारदर्शकता आणि अंतर्गत उत्तरदायित्व यांचा समतोल या निमित्ताने पुन्हा चर्चेत आला आहे. याबाबत कायदेविषयक विश्लेषण करताना ॲड. विशाल काळे यांनी, न्यायालयीन स्वशासनाची विश्वासार्हता टिकविण्यासाठी तक्रारींचे निराकरण व्यक्तिनिष्ठ आरोप-प्रत्यारोपांऐवजी पारदर्शक, निष्पक्ष आणि निर्धारित संस्थात्मक प्रक्रियेतून होणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले. रोस्टर निश्चित करण्याचे अधिकार मुख्य न्यायमूर्तींकडे असले, तरी त्यांचा वापर नियमाधारित आणि न्यायालयीन कामकाजातील विश्वास कायम ठेवणारा असणे ही संस्थात्मक गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले.

# वाहनांच्या डिलिव्हरीचे आमिष; ९७ लाखांची फसवणूक

डेवलप्ड नेशन्स
developednationslaw@gmail.com

**पुणे :** चारचाकी वाहनांची डिलिव्हरी देण्याचे आमिष दाखवून तब्बल ९७ लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी आरोपी संजय अग्रवाल याचा अटकपूर्व जामीन अतिरिक्त सत्र न्यायाधीश एस. आर. पवार यांनी फेटाळला. त्यामुळे अग्रवालच्या अटकेचा मार्ग मोकळा झाला आहे. नयन अगरवाल यांनी डेक्कन पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार, वाहनांच्या खरेदी-विक्रीसाठी एजंट म्हणून काम करणाऱ्या अग्रवाल याने त्यांच्याकडून ९७ लाख रुपये घेतले. मात्र, पैसे घेतल्यानंतर वाहनांची डिलिव्हरी न देता रक्कमही परत केली नाही. या प्रकरणातील ९७ लाख रुपयांची रक्कम अद्याप जप्त झालेली नाही, तसेच सहआरोपी मोहम्मद बागवान याला पोलिसांनी यापूर्वीच अटक केली आहे. अग्रवालने सामंजस्य करारात वाहनांची मूळ कागदपत्रे हरवल्याचा दावा केला होता. मात्र, ही कागदपत्रे फिर्यादीकडेच असल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आले. सरकार पक्षासह फिर्यादीच्या वतीने ॲड. पुष्कर पाटील आणि ॲड. आकाश कामठे यांनी अटकपूर्व जामिनास जोरदार विरोध केला. फसवणुकीची रक्कम मोठी असून तपासासाठी आरोपीची कोठडी आवश्यक असल्याचा युक्तिवाद त्यांनी केला. न्यायालयाने दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून अग्रवालचा जामीन अर्ज फेटाळला. पुढील तपास डेक्कन पोलिस करीत आहेत.

DEVELOPED NATIONS
डेवलप्ड नेशन्स लॉ न्यूज

# बाप्पाचा आवाज मोठा नको; विचार मोठा हवा!

## गणेशोत्सव श्रद्धेचा जागर ठरावा; ध्वनीच्या उन्मादाचा नव्हे



ॲड. रणजित ढोमसे
शिवाजीनगर जिल्हा व सत्र न्यायालय, पुणे येथे पूर्णवेळ वकील

गणपती बाप्पासमोर हात जोडताना मनाला शांतता मिळते; मग त्याच बाप्पाच्या नावाने कानठळ्या बसविणारा आवाज करण्याची गरज काय? श्रद्धा सिद्ध करण्यासाठी आवाजाची पातळी वाढवावी लागते का? हा प्रश्न प्रत्येक गणेशभक्ताने स्वतःला विचारण्याची वेळ आली आहे. श्री गणेश हे बुद्धी, विवेक, ज्ञान आणि मांगल्याचे प्रतीक आहेत. त्यामुळे गणेशोत्सवात डीजेचा कर्णकर्कश आवाज नको, असे म्हणणे म्हणजे हिंदू धर्माला किंवा गणेशोत्सवाला विरोध नव्हे. उलट, आपल्या श्रद्धेचे आणि परंपरेचे मूळ स्वरूप जपण्याची ती भूमिका आहे.

गणेशोत्सवाची ओळख आरती, अथर्वशीर्ष, भजन, कीर्तन, लेझीम, टाळ-मृदंग, ढोल-ताशे, सनई-चौघडा आणि मंगलमय वातावरणाशी आहे. डीजेच्या प्रचंड भिंती आणि कानठळ्या बसविणारा ध्वनी हा आपल्या परंपरेचा भाग कधी झाला? 'ज्याचा आवाज मोठा, त्याची भक्ती मोठी' असे कोणतेही धर्मतत्त्व नाही. उलट शांतपणे गणरायासमोर उभ्या असलेल्या एका भक्ताची श्रद्धा हजारो वॅटच्या ध्वनिक्षेपकांपेक्षा मोठी असू शकते. डीजेला विरोध करणाऱ्याला धर्मविरोधी ठरविणेही योग्य नाही. धर्मावर प्रेम करणे आणि धर्माच्या नावाखाली होणाऱ्या चुकीच्या गोष्टींवर प्रश्न उपस्थित करणे या परस्परविरोधी भूमिका नाहीत. परंपरा जपायची असेल तर तिच्यात कालांतराने शिरलेल्या अनिष्ट बाबींवर आत्मपरीक्षण करण्याचे धैर्यही असायला हवे.



### ✦ उत्साह हवा; उन्माद नको

गणेशोत्सवात उत्साह असावा, आनंद असावा, नृत्य असावे. मात्र, आनंद आणि उन्माद यातील सीमारेषा पुसली जाऊ नये.



आपल्या जल्लोषामुळे वृद्ध व्यक्ती त्रस्त होत असेल, लहान मूल घाबरत असेल, विद्यार्थ्यांच्या अभ्यासात व्यत्यय येत असेल, रुग्णाला त्रास होत असेल किंवा सामान्य नागरिकाला स्वतःच्या घरात शांतता मिळत नसेल, तर आपल्या उत्सवाच्या पद्धतीचा पुनर्विचार करायलाच हवा.

श्रद्धा ही दुसऱ्याच्या शांततेवर अतिक्रमण करण्याचा परवाना नाही.

### ✦ ढोल-ताशांनाही मर्यादा हव्यात

डीजेऐवजी पारंपरिक वाद्यांना प्राधान्य असले पाहिजे. ढोल-ताशांचे शिस्तबद्ध वादन, लेझीम, झांज, टाळ-मृदंग, सनई-चौघडा यामुळे उत्सवाला सांस्कृतिक ओळख मिळते. मात्र, 'पारंपरिक आहे म्हणून कितीही मोठा आवाज चालेल', ही भूमिकाही तितकीच चुकीची आहे.

दोन ढोलांचा मंगलमय नाद आणि शेकडो ढोलांचा अमर्याद आवाज यांचा परिणाम सारखा नसतो. त्यामुळे डीजेला विरोध करताना पारंपरिक वाद्यांच्या आवाजाबाबतही विवेकाची मर्यादा स्वीकारावी लागेल.

### ✦ मंडळाची प्रतिष्ठा साऊंड सिस्टीमने नव्हे, समाजसेवेने

गणेशोत्सव हा केवळ मिरवणुका आणि देखाव्यांचा उत्सव नाही. समाजाला एकत्र आणणे, संस्कार रुजविणे, कला जपणे आणि सामाजिक बांधिलकी वाढविणे हा त्याचा आत्मा आहे.

गरजू विद्यार्थ्यांना मदत, रक्तदान, आरोग्य तपासणी, वृक्षारोपण, स्वच्छता अभियान, व्यसनमुक्ती जनजागृती, स्थानिक कलाकारांना व्यासपीठ आणि पारंपरिक कलांचे संवर्धन अशा उपक्रमांनी उत्सवाचे सामाजिक मूल्य वाढू शकते.

एखाद्या मंडळाची प्रतिष्ठा त्याच्याकडे किती मोठी साऊंड सिस्टीम आहे यावर नव्हे, तर त्याने समाजासाठी वर्षभर काय केले यावर ठरली पाहिजे.

### सार्वजनिक उत्सव, सार्वजनिक जबाबदारी

सार्वजनिक रस्ता हा केवळ उत्सव साजरा करणाऱ्यांचा नसतो. तो रुग्णवाहिकेचा आहे, वृद्धांचा आहे, विद्यार्थ्यांचा आहे, लहान मुलांचा आहे आणि दुसऱ्या दिवशी पहाटे कामावर जाणाऱ्या नागरिकांचाही आहे.

म्हणून सार्वजनिक गणेशोत्सवाचा अधिकार आणि इतर नागरिकांचा शांततेने जगण्याचा अधिकार यांच्यात समतोल राखणे आवश्यक आहे. ही धर्मविरोधी भूमिका नाही; ही सहजीवनाची संस्कृती आहे.

विसर्जन मिरवणूकही आपल्या संस्कृतीचे दर्शन घडविणारी असावी. 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या' या जयघोषात जो भाव आहे, तो कोणत्याही कृत्रिम ध्वनीप्रणालीतून निर्माण होऊ शकत नाही.

### ✦ पुढच्या पिढीला आपण काय देणार?

आजच्या मुलांच्या मनात गणेशोत्सवाची आठवण काय राहणार? डीजे, प्रचंड स्पीकर आणि कानठळ्या बसवणारा आवाज? की आरती, अथर्वशीर्ष, शिस्तबद्ध ढोल-ताशे, लेझीम, सांस्कृतिक देखावे आणि समाजोपयोगी उपक्रम?

आज आपण जे 'सामान्य' मानतो, तेच उद्याच्या पिढीला 'परंपरा' वाटणार आहे. त्यामुळे खरी परंपरा आणि उत्सवात नंतर आलेल्या गोष्टी यातील फरक समजावून सांगण्याची जबाबदारी आजच्या पिढीची आहे.

### ✦ शेवटी प्रश्न डीजेचा नाही...

डीजे नसेल तर गणपतीवरील आपली श्रद्धा कमी होईल का? नाही. कदापि नाही.

गणेशोत्सव मोठ्या उत्साहाने साजरा करूया. आपल्या संस्कृतीचा अभिमानाने जयघोष करूया. ढोल-ताशे वाजू द्या; पण मर्यादेत. पारंपरिक वाद्यांचा नाद घुमू द्या; पण दुसऱ्याच्या शांततेची किंमत मोजून नव्हे.

गणराय बुद्धी आणि विवेकाचे दैवत आहेत. त्यामुळे त्यांचा उत्सवही विवेकी, सुसंस्कृत आणि मंगलमय असायला हवा.

कारण खरा प्रश्न डीजेचा नाही; आपल्या श्रद्धेची उंची आपण आवाजाच्या पातळीने ठरवणार की विवेकाच्या पातळीने, हा आहे.

**गणपती बाप्पा मोरया!**

# वारकरी संस्थेचा निधी धोक्यात? अर्ज धर्मादाय आयुक्तांनी फेटाळला

## निवड झाल्याचे लपविल्याने अर्जदारांना दिलासा नाही; संयुक्त धर्मादाय आयुक्तांचा निर्णय

डेवलप्ड नेशन्स
developednationslaw@gmail.com

**पुणे :** पवन मावळ वारकरी समाज संस्थेच्या बँक खात्याचे व्यवहार नवनिर्वाचित अध्यक्षाला करण्यास प्रतिबंध करावा, या मागणीसाठी दाखल केलेला अर्ज संयुक्त धर्मादाय आयुक्तांनी फेटाळला. संस्थेच्या निवडणुकीत प्रतिस्पर्धी अध्यक्ष म्हणून निवड झाल्याची बाब अर्जदारांनी लपविल्याचे निरीक्षण नोंदवत, संस्थेची मालमत्ता व निधीचा गैरवापर किंवा अपव्यय होण्याचा धोका असल्याचे अर्जदारांना सिद्ध करता आले नाही, असे आदेशात स्पष्ट करण्यात आले.

श्रीक्षेत्र आळंदी येथील पवन मावळ वारकरी समाज संस्थेच्या बँक खात्याचा व्यवहार प्रतिस्पर्धी प्रविण सोपान मुरहे यांना करण्यास परवानगी देऊ नये, अशी मागणी करीत विश्वस्त एकनाथराव टिळे यांच्यासह इतरांनी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियमातील कलम ४१ई अंतर्गत अर्ज केला होता. याप्रकरणी संयुक्त धर्मादाय आयुक्त दिनेश कोथळीकर यांनी ११ ऑगस्ट २०२६ रोजी आदेश दिला.

अर्जदारांच्या म्हणण्यानुसार, मुरहे हे संस्थेचे विश्वस्त नसून बँकेने त्यांना खात्याचा व्यवहार करण्याची परवानगी दिली होती. संस्थेच्या ठरावाशिवाय निधी काढण्यात आल्याचा आणि संस्थेच्या कागदपत्रांमध्ये फेरफार केल्याचा आरोपही करण्यात आला होता.

मात्र, मुरहे यांच्या म्हणण्यानुसार, २ मार्च २०२५ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत २०२५ ते २०३० या कालावधीसाठी नवीन कार्यकारिणीची निवड झाली आणि त्यांची अध्यक्षपदी निवड झाली. त्यानंतर या बदलासंदर्भातील अहवाल धर्मादाय आयुक्त कार्यालयात दाखल करण्यात आला आहे.

न्यायालयीन नोंदींच्या आधारे संयुक्त धर्मादाय आयुक्तांनी नमूद केले की, अर्जदारांना निवडणूक झाल्याची आणि मुरहे यांची अध्यक्षपदी निवड झाल्याची माहिती होती. एवढेच नव्हे, तर अर्जदारांकडील ९ लाख ८० हजार ४३० रुपये नवनिर्वाचित अध्यक्षांकडे देण्यात आले आणि त्यांनी ती रक्कम संस्थेच्या बँक खात्यात जमा केली. त्यामुळे निवडणुकीची प्रक्रिया आणि नवनिर्वाचित अध्यक्षाची माहिती अर्जदारांना होती, हे स्पष्ट होते.

अर्जदारांनी ही महत्त्वाची बाब अर्जात नमूद न केल्याने त्यांनी न्यायालयापासून वस्तुस्थिती लपविल्याचे निरीक्षण आयुक्तांनी नोंदविले. महत्त्वाची वस्तुस्थिती दडवून न्यायालयाकडून दिलासा मागणाऱ्या पक्षकाराला दिलासा देता येत नाही, हे कायद्याचे स्थापित तत्त्व असल्याचे आदेशात स्पष्ट करण्यात आले.

तसेच संस्थेच्या नियमांनुसार निवडणूक प्रक्रिया पार पडल्याचे आणि अर्जदारांनी नवनिर्वाचित अध्यक्षाच्या नावाची नोंद करण्यास संमती दिल्याचेही आदेशात नमूद आहे. त्यामुळे संस्थेचा निधी व मालमत्ता धोक्यात असल्याचे सिद्ध झाले नसल्याचा निष्कर्ष काढत अर्ज फेटाळण्यात आला.

अर्ज क्रमांक ३७/२०२५ खर्चासह फेटाळण्यात आला असून अर्जदारांनी स्वतःचा खर्च करावा आणि प्रतिस्पर्धी क्रमांक एक यांचा खर्चही द्यावा, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# न्यायिक अधिकाऱ्यांचे निवृत्तीवय ६२; सात राज्यांना निर्देश

डेवलप्ड नेशन्स
developednationslaw@gmail.com



**नवी दिल्ली :** जिल्हा न्यायपालिकेतील न्यायिक अधिकाऱ्यांचे निवृत्तीचे वय ६० वरून ६२ वर्षे करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्रासह सात राज्यांना दिले आहेत. ऑल इंडिया जजेस असोसिएशन विरुद्ध केंद्र सरकार प्रकरणात सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहाना यांच्या तीन सदस्यीय खंडपीठाने १ सप्टेंबरला हा आदेश दिला.

महाराष्ट्र, छत्तीसगड, कर्नाटक, मध्य प्रदेश, सिक्कीम, तमिळनाडू आणि पश्चिम बंगालला सेवा नियमांत दोन महिन्यांत दुरुस्ती करण्याचे निर्देश आहेत. तोपर्यंत ६० वर्षे पूर्ण करणाऱ्या अधिकाऱ्यांना निवृत्त केले जाणार नाही. मात्र, ६० वर्षांनंतर सेवा सुरू ठेवण्यासाठी उच्च न्यायालयाकडून त्यांची योग्यता आणि कामगिरी तपासली जाईल. ३१ मार्च २०२६नंतर निवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांनाही दिलासा देण्यात आला आहे. अन्य सरकारी नोकरी किंवा लाभाचे पद स्वीकारले नसेल, तर उच्च न्यायालयाच्या तपासणीनंतर त्यांना पुन्हा न्यायिक सेवेत येण्याची संधी मिळू शकते. जिल्हा न्यायव्यवस्थेतील मंजूर आणि प्रत्यक्ष कार्यरत पदांमधील तफावत भरून काढण्यासाठी अनुभवी अधिकाऱ्यांचा उपयोग करणे, तसेच नागरिकांना वेळेत न्याय मिळवून देणे, हा निर्णयामागील उद्देश आहे. अन्य राज्ये व केंद्रशासित प्रदेशांनीही निवृत्तीवयाबाबत दोन आठवड्यांत फेरविचार करून अनुपालन अहवाल सादर करावा, असे निर्देश देण्यात आले आहेत. पुढील सुनावणी १ ऑक्टोबरला होणार आहे.

DEVELOPED NATIONS
डेवलप्ड नेशन्स लॉ न्यूज
Journalism for justice






# १२ महत्त्वाची कायदेशीर तत्त्वे - सोप्या मराठीत

**१. करारातील हितसंबंधाचे तत्त्व - Doctrine of Privity of Contract**

दोन व्यक्तींमध्ये करार झाला असेल, तर त्या करारातून निर्माण होणारे हक्क आणि जबाबदाऱ्या सामान्यतः त्या करारातील पक्षांपुरत्याच मर्यादित असतात. कराराचा पक्षकार नसलेल्या तिसऱ्या व्यक्तीला केवळ त्या करारामुळे लाभ मिळत असला, तरी सामान्यतः त्याच्या आधारे कराराची अंमलबजावणी मागता येत नाही.

**२. कडक दायित्वाचे तत्त्व - Doctrine of Strict Liability**

एखाद्या व्यक्तीने आपल्या जमिनीवर धोकादायक वस्तू आणून ती साठवली आणि ती वस्तू तेथून बाहेर पडून दुसऱ्याचे नुकसान झाले, तर काही परिस्थितींमध्ये त्या व्यक्तीवर कडक दायित्व येऊ शकते. त्यासाठी निष्काळजीपणा किंवा चुकीचा हेतू सिद्ध करणे आवश्यक नसते. या तत्त्वाचा पारंपरिक आधार Rylands v. Fletcher या प्रकरणात आढळतो.

**३. रास्त अपेक्षेचे तत्त्व - Doctrine of Legitimate Expectation**

सरकारी किंवा प्रशासकीय प्राधिकरणाच्या सातत्यपूर्ण धोरणामुळे, पूर्वीच्या वर्तनामुळे किंवा स्पष्ट आश्वासनामुळे नागरिकाच्या मनात एखादी रास्त अपेक्षा निर्माण झाली असेल, तर प्रशासनाने ती अपेक्षा मनमानीपणे दुर्लक्षित करू नये. मात्र ही अपेक्षा प्रत्येक परिस्थितीत कायदेशीर हक्कात रूपांतरित होतेच असे नाही.

**४. प्रमाणबद्धतेचे तत्त्व - Doctrine of Proportionality**

सरकार किंवा प्रशासनाने घेतलेला निर्णय आणि तो साध्य करण्यासाठी वापरलेले साधन यांच्यात योग्य प्रमाण आणि संतुलन असणे आवश्यक आहे. नागरिकाच्या अधिकारांवर लादलेले निर्बंध उद्देशाच्या तुलनेत अनावश्यक किंवा अतिप्रमाणात नसावेत, हा या तत्त्वाचा गाभा आहे.

**५. सार्वजनिक हितासाठी मालमत्ता अधिग्रहणाचे तत्त्व - Doctrine of Eminent Domain**

सार्वजनिक गरज किंवा सार्वजनिक हितासाठी राज्याला कायद्याने ठरवलेल्या प्रक्रियेनुसार खासगी मालमत्ता अधिग्रहित करण्याचा अधिकार असतो. मात्र हा अधिकार अमर्यादित नाही. कायदेशीर प्रक्रिया, सार्वजनिक उद्देश आणि लागू असलेल्या भरपाईच्या तरतुदींचे पालन आवश्यक असते.

**६. 'घटना स्वतःच बोलते' - Res Ipsa Loquitur**

निष्काळजीपणाच्या प्रकरणात सामान्यतः निष्काळजीपणा सिद्ध करण्याची जबाबदारी दावा करणाऱ्या व्यक्तीवर असते. मात्र अपघाताचे स्वरूप असे असेल की तो सामान्यतः निष्काळजीपणाशिवाय घडत नाही आणि संबंधित वस्तू किंवा परिस्थिती प्रतिवादीच्या नियंत्रणात होती, तर Res Ipsa Loquitur हे तत्त्व लागू होऊ शकते. म्हणजेच, परिस्थिती स्वतःच निष्काळजीपणाकडे निर्देश करते.

**७. दुसऱ्या पक्षाचे म्हणणे ऐकले पाहिजे - Audi Alteram Partem**

कोणत्याही व्यक्तीविरुद्ध प्रतिकूल निर्णय घेण्यापूर्वी त्याला आपली बाजू मांडण्याची योग्य संधी दिली पाहिजे. नैसर्गिक न्यायाच्या या मूलभूत तत्त्वानुसार संबंधित व्यक्तीला आरोप किंवा मुद्द्यांची माहिती, उत्तर देण्याची संधी आणि योग्य सुनावणी मिळणे आवश्यक आहे.

**८. जिथे हक्क, तिथे उपाय - Ubi Jus Ibi Remedium**

ज्या ठिकाणी कायदेशीर हक्क अस्तित्वात आहे, तेथे त्या हक्काच्या संरक्षणासाठी कायदेशीर उपाय उपलब्ध असतो, हा या तत्त्वाचा मूलभूत अर्थ आहे. हक्काचे उल्लंघन झाल्यास कायद्याने उपलब्ध असलेल्या योग्य उपायासाठी संबंधित व्यक्ती न्यायालयात दाद मागू शकते.

**९. कायद्याचे अज्ञान क्षम्य नाही - Ignorantia Legis Neminem Excusat**

"मला हा कायदा माहीत नव्हता" हा दावा सामान्यतः कायद्याचे उल्लंघन केल्यापासून मुक्त करणारा वैध बचाव ठरत नाही. समाजातील प्रत्येक व्यक्तीवर लागू असलेल्या कायद्याचे पालन करण्याची जबाबदारी असते.

**१०. एकाच कारणासाठी पुन्हा पुन्हा त्रास देऊ नये - Nemo Debet Bis Vexari Pro Una Et Eadem Causa**

एकाच कारणासाठी किंवा त्याच विषयावर एखाद्या व्यक्तीला वारंवार न्यायालयीन त्रास दिला जाऊ नये, हे या तत्त्वाचे सार आहे. अंतिम निर्णय झाल्यानंतर त्याच पक्षांमध्ये त्याच कारणावर पुन्हा पुन्हा खटला चालवण्यास प्रतिबंध करण्यामागे न्यायव्यवस्थेतील अंतिमतेची संकल्पना महत्त्वाची आहे.

**११. न्यायालयीन कृतीमुळे कोणाचेही नुकसान होऊ नये - Actus Curiae Neminem Gravabit**

न्यायालयाच्या कृतीमुळे, न्यायालयीन प्रक्रियेतील चूक किंवा विलंबामुळे कोणत्याही पक्षाला अन्यायकारक नुकसान होऊ नये, हा या तत्त्वाचा अर्थ आहे. न्यायालयीन प्रक्रियेतील त्रुटीचा अन्यायकारक भार एखाद्या पक्षावर पडू नये, याची काळजी न्यायालय घेते.

**१२. कायदा अशक्य गोष्ट करण्यास भाग पाडत नाही - Lex Non Cogit Ad Impossibilia**

कायदा एखाद्या व्यक्तीला प्रत्यक्षात अशक्य असलेली गोष्ट करण्यास भाग पाडत नाही. कायदेशीर कर्तव्य पार पाडणे वस्तुनिष्ठ परिस्थितीमुळे अशक्य झाले असेल, तर त्या अशक्यतेचा कायदा योग्य विचार करतो.

एक महत्त्वाची दुरुस्ती: क्रमांक ६ मधील Res Ipsa Loquitur हे "न्यायालयीन नुकसानभरपाई"चे स्वतंत्र तत्त्व नसून निष्काळजीपणा सिद्ध करण्यास मदत करणारे पुराव्याचे तत्त्व आहे. तसेच Strict Liability आणि Absolute Liability हे एकच नाहीत; दोन्हींमध्ये महत्त्वाचा कायदेशीर फरक आहे. ■■■

# डीजेचा दणदणाट; कायद्याची लक्ष्मणरेषा कुठे?

## उत्सवाचा अधिकार अमर्याद नाही; दुसऱ्याच्या शांततेवर अतिक्रमण करण्याची मुभा कोणालाही नाही



गणेशोत्सव म्हणजे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनातील उत्साहाचा, भक्तीचा आणि सामूहिक आनंदाचा सोहळा. गणपतीची आरास, रोषणाई, ढोल-ताशांचा गजर, मिरवणुका आणि त्यात मिसळलेला डीजेचा दणदणाट हे चित्र आता अपरिचित राहिलेले नाही. पण या उत्साहाच्या आवाजात एक मूलभूत प्रश्न अनेकदा दबून जातो—उत्सव साजरा करण्याचा अधिकार नेमका कुठपर्यंत आणि दुसऱ्याच्या शांततेच्या अधिकाराची सुरुवात कुठून?

हा प्रश्न उत्सवविरोधाचा नाही; तो कायद्याच्या राज्याचा आहे. भारतीय राज्यघटनेने नागरिकांना धर्माचे स्वातंत्र्य दिले आहे. अभिव्यक्तीचे स्वातंत्र्यही दिले आहे. सांस्कृतिक परंपरा जपण्याचा अधिकारही आहे. मात्र कोणताही मूलभूत अधिकार अमर्याद नाही. सार्वजनिक सुव्यवस्था, आरोग्य, नैतिकता आणि इतर नागरिकांचे अधिकार यांचा विचार करूनच या स्वातंत्र्यांचा उपभोग घ्यावा लागतो. त्यामुळे 'आमचा सण, आमचा आवाज' हा युक्तिवाद कायद्यापुढे अंतिम ठरू शकत नाही.



**संदीप बोरसे**
सहायक प्राध्यापक, डी.ई.एस.,
श्री. नवलमल फिरोदिया
विधी महाविद्यालय, पुणे

ध्वनिप्रदूषण नियंत्रणासाठी देशात Noise Pollution (Regulation and Control) Rules, 2000 लागू आहेत. सार्वजनिक ठिकाणी लाऊडस्पीकर किंवा ध्वनिवर्धक वापरण्यासाठी संबंधित प्राधिकरणाची परवानगी आवश्यक आहे. रात्री १० ते सकाळी ६ या कालावधीत ध्वनिवर्धक वापरण्यावर सर्वसाधारण निर्बंध आहेत. विशिष्ट सणांच्या प्रसंगी राज्य सरकार मर्यादित दिवसांसाठी रात्री १० ते मध्यरात्रीपर्यंत सूट देऊ शकते; परंतु त्यालाही कायदेशीर मर्यादा आहेत.

म्हणून परवानगी म्हणजे अमर्याद आवाजाची सनद नव्हे.

परवानगी घेतली असेल तरी ध्वनीची निर्धारित मर्यादा, वेळ आणि इतर अटी पाळाव्याच लागतात. डीजेचा आवाज किती आहे, कोणत्या वेळेत आहे, परिसर कोणता आहे आणि त्याचा परिणाम कोणावर होत आहे, या प्रश्नांना कायद्याच्या दृष्टीने महत्त्व आहे.

इथेच 'डीजे विरुद्ध ढोल-ताशा' असा कृत्रिम संघर्ष उभा करण्याची गरज नाही. ढोल-ताशा ही महाराष्ट्राची समृद्ध सांस्कृतिक परंपरा आहे. त्यातून शिस्त, समूहभावना आणि सांस्कृतिक अस्मिता जपली जाते. पण परंपरा जुनी आहे म्हणून कायदा तिच्याकडे डोळेझाक करणार नाही. त्याचप्रमाणे डीजे आधुनिक आहे म्हणून तो आपोआप बेकायदा ठरत नाही. कायद्याची कसोटी साधनाची नाही; त्याच्या वापराची आणि परिणामाची आहे.

मोठा आवाज म्हणजे केवळ कानांना होणारा त्रास नाही. त्याचा परिणाम रुग्ण, वृद्ध, लहान मुले, विद्यार्थी आणि निवासी भागातील नागरिकांवर होऊ शकतो. एखाद्या रुग्णालयाजवळ रात्री उशिरापर्यंत होणारा कर्णकर्कश आवाज आणि मिरवणुकीतील काही काळाचा नियंत्रित उत्सवी नाद यांची तुलना एकाच तराजूत करता येणार नाही. म्हणूनच कायदा परिस्थितीनुसार मर्यादा निश्चित करतो.

मात्र कायद्यापेक्षाही मोठी समस्या अनेकदा कायद्याच्या अंमलबजावणीतील विसंगतीची असते.

परवानगी देताना अटी स्पष्ट असतात; पण त्या अटींची तपासणी किती काटेकोरपणे होते? ध्वनीमर्यादा मोजण्यासाठी यंत्रणा असून तिचा प्रत्यक्ष वापर किती होतो? नियम मोडणाऱ्यांवर कारवाई होते का? आणि कारवाई झाली तर ती सर्व मंडळांवर समान होते का? एखाद्या छोट्या मंडळावर कठोर कारवाई आणि प्रभावशाली मंडळाकडे दुर्लक्ष झाले, तर प्रश्न डीजेचा राहत नाही; प्रश्न कायद्याच्या समान अंमलबजावणीचा बनतो.

लोकशाहीत कायदा मोठ्या माणसासाठी वेगळा आणि सामान्य नागरिकासाठी वेगळा असू शकत नाही.

दुसरीकडे, ध्वनिप्रदूषणाविरोधात तक्रार करणाऱ्या नागरिकाला 'उत्सवविरोधी' ठरविणेही तितकेच चुकीचे आहे. त्याला शांततेत जगण्याचा अधिकार आहे. रात्री झोप न लागणे, अभ्यासात व्यत्यय येणे, आजारी व्यक्तीला त्रास होणे किंवा वृद्ध व्यक्तीच्या आरोग्यावर परिणाम होणे—या तक्रारींना 'सणाच्या उत्साहात एवढे चालायचेच' म्हणून झटकून टाकता येणार नाही.

उत्सवाचा आनंद हा सामूहिक असतो; त्याची किंमत मात्र एखाद्या एकट्या नागरिकाने मोजायची नसते. याच ठिकाणी कायद्याची लक्ष्मणरेषा स्पष्ट होते. एखाद्याचा अधिकार दुसऱ्याच्या अधिकारावर अतिक्रमण करू लागतो, तेव्हा राज्याला हस्तक्षेप करावा लागतो. धार्मिक स्वातंत्र्य महत्त्वाचे आहे; पण दुसऱ्याच्या आरोग्याचा आणि शांततेचा प्रश्नही तितकाच महत्त्वाचा आहे. सार्वजनिक जीवनात अधिकारांमध्ये समतोल राखणे हीच लोकशाहीची खरी परीक्षा आहे.

गणेशोत्सव मंडळांनीही कायद्याकडे अडथळा म्हणून पाहण्याची गरज नाही. ध्वनीमर्यादेचे पालन, साऊंड लेव्हल मीटरचा वापर, मिरवणुकीची वेळ, ध्वनिवर्धकांची संख्या, रुग्णालये व शाळांच्या परिसराचा विचार आणि निवासी भागातील नागरिकांची गैरसोय टाळणे—या गोष्टी उत्सवाच्या नियोजनाचाच भाग बनल्या पाहिजेत. उत्साहाला शिस्त लावणे म्हणजे उत्सवाची मजा कमी करणे नव्हे; उलट त्याला सामाजिक प्रतिष्ठा देणे होय. प्रशासनाची जबाबदारीही तितकीच मोठी आहे. नियम स्पष्ट असावेत, परवानगीची प्रक्रिया पारदर्शक असावी, ध्वनीमर्यादेची तपासणी प्रत्यक्ष व्हावी आणि नियमभंग करणाऱ्यांवर पक्षपात न करता कारवाई व्हावी. 'कोणाचे मंडळ?' यापेक्षा 'कायदा मोडला का?' हा प्रश्न महत्त्वाचा ठरला पाहिजे. कारण शेवटी प्रश्न डीजेचा नाही. प्रश्न कायद्याचा आणि नागरिकांच्या परस्पर सन्मानाचा आहे. आपण गणेशोत्सवात गणरायाची प्रतिष्ठापना करतो. पण त्याच वेळी सार्वजनिक जीवनात संयम, शिस्त आणि सहजीवनाचीही प्रतिष्ठापना करता येणार नाही का? भक्तीचा आवाज मोठा असण्याची गरज नाही; तो मनापर्यंत पोहोचला तरी पुरेसे आहे.

म्हणून यंदा प्रश्न असा नसावा की 'डीजे किती मोठ्या आवाजात वाजवता येईल?' प्रश्न असा असावा—'आपला आनंद दुसऱ्याच्या अधिकाराला धक्का न लावता किती सुंदरपणे साजरा करता येईल?' कारण कायदा उत्सवाचा शत्रू नाही; तो उत्सव आणि नागरिकांच्या अधिकारांमध्ये समतोल राखणारी लक्ष्मणरेषा आहे. ती ओलांडली की उत्सवाचा आवाज राहात नाही; तो दुसऱ्याच्या हक्कावरचा अतिक्रमण ठरतो. ■■■

DEVELOPED NATIONS
डेवलप्ड नेशन्स लॉ न्यूज
Journalism for Justice

# लग्नानंतर स्वप्नांना भरारी; सुषमा माने यांच्या जिद्दीला काळ्या कोटाची साथ

**लग्नानंतर मुलीच्या आयुष्याला नवी दिशा मिळते; पण त्या नव्या दिशेत तिच्या स्वतःच्या स्वप्नांना स्थान मिळेलच, असे नाही. संसार, कुटुंब आणि जबाबदाऱ्यांच्या गर्दीत अनेक स्वप्ने अलगद मागे पडतात. मात्र काही जिद्दी व्यक्ती परिस्थितीला अडथळा न मानता त्यातूनच स्वतःची वाट निर्माण करतात. ॲड. सुषमा शांतिकुमार माने यांचा शिक्षणापासून वकिलीपर्यंतचा प्रवास ही अशाच जिद्दीची आणि कुटुंबाच्या विश्वासाची प्रेरणादायी कहाणी आहे.**

अकरावीनंतर सुषमा माने यांचे लग्न झाले. त्या काळात शिक्षणाचा प्रवास थांबण्याची शक्यता असतानाही त्यांच्या आयुष्याला वेगळी दिशा मिळाली. लग्नानंतर त्यांनी बारावीचे शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर कला शाखेतून पदवी घेतली आणि पुढे कायद्याचे शिक्षणही पूर्ण केले. विशेष म्हणजे, नोकरी किंवा आर्थिक गरज हा त्यांच्या शिक्षणामागचा हेतू नव्हता. घरातील मुलगी उच्चशिक्षित असावी, तिने स्वतःची ओळख निर्माण करावी आणि तिच्यात आत्मविश्वास असावा, ही त्यांच्या सासरच्या मंडळींची मनापासूनची भावना होती.



ॲड. सुषमा माने

जैनकवाडी, ता. बारामती येथील सासरच्या घराने सुषमा यांना केवळ सून म्हणून पाहिले नाही, तर मुलगी म्हणून स्वीकारले. "तुला शिकायचे आहे ना? आम्ही तुझ्या पाठीशी आहोत," या भावनेतून मिळालेला आधार त्यांच्या आयुष्यातील मोठी शक्ती ठरला. शिक्षणासाठी पैसा, साधने आणि वेळ आवश्यक असतात; मात्र स्वप्न पूर्ण करण्यासाठी सर्वप्रथम लागतो तो विश्वास. सुषमा यांच्या वाट्याला हा विश्वास आला.

सावळ, ता. बारामती येथील बालगुडेपट्टा हे त्यांचे माहेर. माहेरकडून मिळालेले संस्कार आणि सासरकडून मिळालेला विश्वास या दोन आधारस्तंभांवर त्यांचा पुढचा प्रवास उभा राहिला. संसार सांभाळत अभ्यास करणे सोपे नव्हते. घरातील कामे, कुटुंबाच्या जबाबदाऱ्या आणि त्यातून उरलेला वेळ अभ्यासासाठी देताना अनेकदा रात्री उशिरापर्यंत पुस्तकांशी मैत्री करावी लागली. थकवा होता; पण त्यावर मात करणारी जिद्दही होती.

कायद्याच्या शिक्षणाने त्यांच्या विचारांना नवी व्यापकता दिली. कलमे, न्यायालयीन निर्णय आणि कायद्याची भाषा शिकताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली—कायदा हा केवळ पुस्तकातील विषय नाही; तो माणसाच्या हक्कांशी, प्रतिष्ठेशी आणि आयुष्याशी जोडलेला आहे.

कायद्याचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर वकिलीच्या क्षेत्रात प्रवेश करताना एक नवा अध्याय सुरू झाला. आतापर्यंत पुस्तकांत वाचलेला कायदा आता न्यायालयाच्या प्रत्यक्ष वातावरणात अनुभवायचा होता. न्यायालयाच्या पायऱ्या, हातातील फाईल, वकिलांची लगबग, पक्षकारांच्या चेहऱ्यावरची अपेक्षा आणि न्यायाधीशांसमोर होणारा युक्तिवाद—या सगळ्याने वकिलीचा खरा अर्थ अधिक स्पष्ट झाला.

पहिल्यांदा काळा कोट परिधान करण्याचा क्षण प्रत्येक वकिलासाठी अविस्मरणीय असतो. सुषमा माने यांच्यासाठी तो केवळ कर्तृत्वाचा क्षण नव्हता, तर अनेक वर्षांच्या मेहनतीला मिळालेली पावती होती. त्या काळ्या कोटात त्यांना स्वतःची जिद्द दिसत होती; त्याचबरोबर माहेरचे संस्कार आणि सासरच्या माणसांचा विश्वासही जाणवत होता.

वकिलीची खरी ओळख पदवी मिळाल्यानंतर सुरू होते. न्यायालयात येणारा प्रत्येक पक्षकार केवळ फाईल घेऊन येत नसतो; तो आपल्या आयुष्यातील एखादी वेदना, अन्याय, हक्क किंवा अपेक्षा घेऊन येत असतो. त्यामुळे वकिलाच्या हातात केवळ कायद्याची कलमे नसतात, तर एखाद्याच्या न्यायाच्या आशेची जबाबदारीही असते. ही जाणीव सुषमा यांच्या वकिलीच्या प्रवासाला अधिक अर्थपूर्ण बनवते.

सुषमा माने यांची कहाणी केवळ एका महिलेने शिक्षण पूर्ण करून वकिली सुरू केली, एवढीच नाही. ती कुटुंबाच्या विश्वासाने एका स्त्रीच्या क्षमतेला दिलेल्या संधीची कथा आहे. मुलीच्या शिक्षणाकडे केवळ नोकरी किंवा उत्पन्नाचे साधन म्हणून पाहण्याची गरज नाही. शिक्षण विचार देते, आत्मविश्वास देते आणि स्वतःचे निर्णय घेण्याचे बळ देते. आजच्या काळात मुलींच्या शिक्षणासाठी अनेक संधी उपलब्ध आहेत; पण घरातून मिळणारा प्रोत्साहनाचा एक शब्द त्याहून अधिक परिणामकारक ठरतो. "तू करू शकतेस," हा विश्वास एखाद्या मुलीच्या आयुष्याला दिशा देऊ शकतो. सुषमा माने यांच्या प्रवासात या विश्वासाचे सामर्थ्य ठळकपणे दिसते. त्यांच्या वाटचालीतून एक महत्त्वाचा संदेश समोर येतो.

लग्न हे स्त्रीच्या स्वप्नांचा शेवट नसतो; योग्य साथ मिळाली तर ते नव्या स्वप्नांची सुरुवात ठरू शकते. संसार आणि शिक्षण, कुटुंब आणि करिअर यांची सांगड घालणे आव्हानात्मक असले तरी अशक्य नाही. सुषमा माने यांनी अंगावर चढवलेला काळा कोट त्यांच्या कर्तृत्वाचा अभिमान आहे; पण त्या कोटामागे उभा आहे तो माहेर-सासरचा विश्वास. म्हणूनच त्यांच्या यशाचे कौतुक करताना त्यांच्या पाठीशी ठामपणे उभ्या राहिलेल्या दोन्ही कुटुंबांचेही कौतुक व्हायला हवे.

एका मुलीला शिकवणे म्हणजे केवळ तिचे भविष्य घडवणे नव्हे; तर संपूर्ण कुटुंबाच्या विचारविश्वाला नवी दिशा देणे होय. सुषमा माने यांच्या प्रवासाने हेच अधोरेखित केले आहे.

अकरावीनंतर झालेला विवाह त्यांच्या शिक्षणाचा शेवट ठरला नाही. बारावी, कला शाखेची पदवी आणि कायद्याचे शिक्षण पूर्ण करून त्यांनी वकिलीच्या क्षेत्रात प्रवेश केला. हा प्रवास सांगतो—परिस्थिती बदलली तरी जिद्द जिवंत असेल आणि कुटुंबाचा विश्वास सोबत असेल, तर स्वप्नांना पुन्हा पंख देता येतात.

ॲड. सुषमा शांताराम माने यांच्या पुढील वकिलीच्या वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा. त्यांच्या हातातील कायद्याचे पुस्तक आणि अंगावरील काळा कोट अनेक महिलांना एकच संदेश देत राहो. "लग्नानंतर स्वप्नं संपत नाहीत; विश्वास मिळाला की ती नव्याने फुलतात."

# गणपती विसर्जनाला 'सवलत' नव्हे, पर्यावरणाला न्याय हवा!

## पीओपीच्या प्रश्नावर दरवर्षीचा संभ्रम थांबवा; कायमस्वरूपी धोरणाची गरज

✦ मनोज बालगुडे

**गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाचा अविभाज्य भाग आहे. श्रद्धा, परंपरा आणि सामाजिक एकोपा यांचे दर्शन घडविणारा हा उत्सव पर्यावरणाच्या किंमतीवर साजरा व्हावा, अशी मात्र कोणाचीही अपेक्षा असू नये. प्लास्टर ऑफ पॅरिसच्या (पीओपी) मूर्तींच्या विसर्जनाचा प्रश्न गेली अनेक वर्षे न्यायालय, सरकार, प्रशासन, मूर्तिकार आणि गणेश मंडळांमध्ये चर्चेत आहे. दरवर्षी उत्सव जवळ आला की नियम, निर्बंध, सवलती आणि न्यायालयीन आदेश यांचा नवा अध्याय सुरू होतो. ही स्थिती आता संपायला हवी.**

पीओपी मूर्तींचा प्रश्न केवळ मूर्ती कोणत्या पदार्थापासून बनविली आहे, एवढ्यापुरता मर्यादित नाही. विसर्जनानंतर तिचे काय होते, हा खरा प्रश्न आहे. नैसर्गिक जलस्रोतांमध्ये पीओपीचे अवशेष आणि रासायनिक रंग मिसळल्याने पर्यावरणावर परिणाम होतो. त्यामुळे पर्यावरणपूरक विसर्जनाची भूमिका ही श्रद्धेविरोधी नसून पुढच्या पिढीच्या हक्काची भूमिका आहे.

मुंबई उच्च न्यायालयाने यापूर्वी पीओपी मूर्तींच्या नैसर्गिक जलस्रोतांमधील विसर्जनाबाबत कठोर भूमिका घेतली होती. न्यायालयाने कृत्रिम तलावांचा पर्याय पुढे केला. लहान मूर्तींसाठी ही व्यवस्था करण्याची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थांवर टाकण्यात आली. मात्र मोठ्या मूर्तींच्या विसर्जनाचा प्रश्न उपस्थित झाला आणि प्रशासनाने आवश्यक कृत्रिम तलावांची व्यवस्था करणे अवघड असल्याचे सांगितले. त्यातून पुन्हा तात्पुरता तोडगा काढण्याची वेळ आली.

येथेच शासनाच्या धोरणातील विसंगती दिसते. पर्यावरणाचे रक्षण करायचे असेल, तर त्यासाठी पायाभूत व्यवस्था आधी निर्माण करावी लागते. उत्सवाच्या काही दिवस आधी 'कृत्रिम तलाव उपलब्ध नाहीत' असे सांगणे हा नियोजनाचा अभाव आहे. मोठ्या मूर्तींचे विसर्जन कुठे करायचे, किती कृत्रिम तलाव लागतील, त्यांची क्षमता किती असेल, विसर्जनानंतर जमा होणाऱ्या पीओपीचे व्यवस्थापन कसे करायचे, याचे नियोजन वर्षभर आधी करता येते.

न्यायालयाने सरकारला पर्यावरणीय प्रश्न सोडविण्यासाठी धोरण आखण्याची संधी दिली आहे. ही संधी पुन्हा तात्पुरती सवलत देण्यात वाया जाऊ नये. महाराष्ट्र सरकारने तज्ज्ञ, पर्यावरणतज्ज्ञ, मूर्तिकार, गणेश मंडळे आणि स्थानिक स्वराज्य संस्थांशी चर्चा करून स्पष्ट, व्यवहार्य आणि दीर्घकालीन धोरण तयार केले पाहिजे. दरवर्षी न्यायालयात धाव घेण्याची वेळ येणे हे कोणत्याही यंत्रणेच्या दृष्टीने भूषणावह नाही. मूर्तिकारांच्या अडचणींकडेही दुर्लक्ष करता येणार नाही. अनेक कुटुंबांचा रोजगार गणेशमूर्ती निर्मितीशी जोडलेला आहे. अचानक बंदी घातल्यास त्यांच्यावर आर्थिक परिणाम होऊ शकतो. त्यामुळे पर्यावरण संरक्षण आणि मूर्तिकारांचे उपजीविकेचे हित यांचा समतोल साधणारी संक्रमण व्यवस्था आवश्यक आहे. शाडू मातीच्या मूर्तींसाठी उपलब्धता, खर्च, वाहतूक आणि उत्पादनक्षमता यांचा विचार करून शासनाने मूर्तिकारांना तांत्रिक व आर्थिक मदत दिली पाहिजे.



मात्र 'रोजगाराचा प्रश्न आहे' म्हणून पर्यावरणीय नियम कायमचे बाजूला सारणेही योग्य नाही. जगभरात उद्योग आणि परंपरा बदलत्या पर्यावरणीय गरजांनुसार बदलत आहेत. गणेशोत्सवही त्याला अपवाद असण्याचे कारण नाही. पर्यावरणपूरक मूर्ती ही परंपरेला विरोध करणारी नव्हे, तर परंपरेला भविष्यात टिकविणारी दिशा ठरू शकते. गणेशोत्सवाची खरी ताकद मूर्तीच्या आकारात नसते. भक्तीची उंची मूर्तीच्या उंचीने मोजता येत नाही. काही फुटांची मूर्ती अधिक धार्मिक आणि वीस फुटांची मूर्ती अधिक भक्तिमय, असा कोणताही धार्मिक निकष नाही. त्यामुळे 'मोठी मूर्ती म्हणजे मोठी श्रद्धा' या मानसिकतेवरही पुनर्विचार करण्याची गरज आहे.

सार्वजनिक गणेशोत्सवाच्या परंपरेला लोकमान्य टिळकांनी सामाजिक संघटन आणि जनजागृतीची जोड दिली. आज त्या परंपरेत पर्यावरणसंवर्धनाचा संदेश जोडणे ही काळाची गरज आहे. मंडळांनी मोठ्या मूर्ती, मोठा खर्च आणि मोठ्या मिरवणुकीऐवजी पर्यावरणपूरक उत्सवाची स्पर्धा सुरू केली, तर गणेशोत्सवाचा सामाजिक आशय अधिक समृद्ध होईल. स्थानिक स्वराज्य संस्थांची भूमिका येथे निर्णायक आहे. कृत्रिम तलाव केवळ नावापुरते उभारून चालणार नाहीत. त्यांची क्षमता, स्वच्छता, पाणी, सुरक्षा, वाहतूक व्यवस्था आणि विसर्जनानंतरच्या गाळाचे व पीओपी अवशेषांचे व्यवस्थापन यांचे नियोजन आवश्यक आहे. मागील वर्षांचा अनुभव घेऊन पुढील वर्षाची व्यवस्था सुधारली पाहिजे.

नागरिकांची जबाबदारीही कमी नाही. पर्यावरणपूरक पर्याय उपलब्ध असताना केवळ प्रतिष्ठेसाठी मोठी पीओपी मूर्ती घेण्याची मानसिकता बदलली पाहिजे. गणेशमूर्ती घरात किंवा मंडपात किती मोठी आहे, यापेक्षा तिच्या माध्यमातून समाजाला कोणता संदेश दिला जातो, हे महत्त्वाचे ठरले पाहिजे. न्यायालयाला दरवर्षी श्रद्धा आणि पर्यावरण यांच्यात मध्यस्थी करण्याची वेळ येऊ नये. न्यायालयाचा हस्तक्षेप हा प्रशासनाच्या अपुऱ्या नियोजनाची जागा घेऊ शकत नाही. सरकारने स्पष्ट धोरण करावे, स्थानिक प्रशासनाने त्याची अंमलबजावणी करावी आणि गणेश मंडळांनी स्वयंशिस्त स्वीकारावी—हीच योग्य दिशा आहे.

गणेशोत्सव आणि पर्यावरण यांच्यात संघर्ष नाही; संघर्ष आहे तो जुन्या सवयी आणि नव्या जबाबदारीमध्ये. श्रद्धा टिकवायची असेल, तर निसर्गही टिकवावा लागेल. गणपती बाप्पाला निरोप देताना नदी, तलाव किंवा समुद्राला प्रदूषणाची भेट देणे ही भक्तीची परंपरा होऊ शकत नाही. महाराष्ट्राने आता 'यंदापुरते' निर्णय घेण्याची पद्धत सोडून पुढील दहा-पंधरा वर्षांचा विचार करणारे धोरण स्वीकारले पाहिजे. पीओपी मूर्तींच्या निर्मितीपासून विसर्जनापर्यंत संपूर्ण साखळीचे नियमन, पर्यायी तंत्रज्ञानाला प्रोत्साहन आणि मूर्तिकारांना संक्रमण काळात मदत—या तीन आघाड्यांवर काम झाले, तर हा वाद कायमचा संपवता येईल. गणेशोत्सवाची प्रतिष्ठा न्यायालयीन सवलतीत नाही; पर्यावरणाची काळजी घेत श्रद्धा जपण्यात आहे. 'गणपती बाप्पा मोरया'चा जयघोष करताना पुढच्या पिढीसाठी स्वच्छ जलस्रोतही ठेवूया—हीच आजच्या गणेशभक्तीची खरी परीक्षा आहे.



**मुंबई : महाराष्ट्र जीएसटी न्यायाधिकरणाचे सदस्य म्हणून प्रतिनियुक्ती झालेले तसेच महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाचे (महारेरा) न्यायनिर्णय अधिकारी व सदस्य माननीय जिल्हा न्यायाधीश ए. एल. अलासपूरकर यांची 'डेवलप्ड नेशन्स न्यूज चे मुख्य मार्गदर्शक ॲड. विशाल विजयराव काळे यांनी सदिच्छा भेट घेतली. यावेळी त्यांना 'डेवलप्ड नेशन्स न्यूज'ची प्रत भेट देण्यात आली.**

# सर्व तालुक्यांत नोटरी वकिलांना मिळणार नोटरी तिकिटे

डेवलप्ड नेशन्स
developednationslaw@gmail.com

**पुणे :** राज्यातील नोटरी वकिलांना नोटरी तिकिटे मिळण्यासाठी आता प्रत्येक तालुक्यातील तहसील कार्यालयातील उपकोषागार विभागामार्फत व्यवस्था उपलब्ध करून देण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निर्देशानंतर याबाबतची प्रशासकीय कार्यवाही सुरू झाली आहे.

नोटरी (भारत सरकार) तथा नोटरी प्रॅक्टिश्नर्स असोसिएशन, महाराष्ट्र राज्याच्या पुणे जिल्हा (ग्रामीण) शाखेचे अध्यक्ष ॲड. दिपक संभाजी चौधरी पाटील यांनी ३ जून २०२६ रोजी याबाबत महसूल विभागाकडे संदर्भ अर्ज केला होता. त्यावर महसूल मंत्र्यांच्या निर्देशानुसार शासन पृष्ठांक क्रमांक मंत्री/महसूल/जनरल/११६६५/२०२६, दि. ८ जून २०२६ अन्वये सहाय्यक नोंदणी महानिरीक्षक तथा कार्यासन अधिकारी क्रमांक ५, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना आवश्यक कार्यवाहीचे आदेश देण्यात आले. त्यानुसार सहाय्यक नोंदणी महानिरीक्षक तथा कार्यासन अधिकारी प्रवीण देशपांडे यांनी ७ जुलै २०२६ रोजी कोषागार अधिकारी, कोषागार कार्यालय, पुणे जिल्हा यांच्याकडे आदेशपत्र जा.क्र. का.५/मुद्रांक/सं.क्र.१५१/२०२६/४३९ अन्वये पुढील कार्यवाहीसाठी पत्र पाठविले आहे. या प्रक्रियेमुळे पुणे जिल्ह्यासह राज्यातील सर्व तालुक्यांमधील तहसील कार्यालयांच्या उपकोषागार विभागामार्फत नोटरी वकिलांना शासनाकडून नोटरी तिकिटे उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा होण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे नोटरी वकिलांना तिकिटांसाठी जिल्हा कोषागार कार्यालय तसेच तहसील कार्यालयातील उपकोषागार कार्यालयाशी संपर्क साधता येणार आहे. दरम्यान, संबंधित आदेशपत्राची प्रत प्रत्येक नोटरी वकिलाने आपल्या जिल्ह्यातील कोषागार कार्यालय तसेच तालुक्यातील उपकोषागार कार्यालयात सादर करून नोटरी तिकिटे उपलब्ध करून देण्याबाबत आवश्यक कार्यवाही करावी, असे आवाहन ॲड. दिपक संभाजी चौधरी पाटील यांनी केले आहे.

# वकिलांवर हात उचलाल तर सात वर्षे तुरुंगवास!

## गोवा विधानसभेत 'ॲडव्होकेट्स प्रोटेक्शन बिल' मंजूर

डेवलप्ड नेशन्स
developednationslaw@gmail.com

**पणजी :** वकिलांवर हल्ला, गंभीर दुखापत, धमकी किंवा व्यावसायिक कामकाजात अडथळा आणणाऱ्यांना आता कडक शिक्षेला सामोरे जावे लागणार आहे. गोवा विधानसभेने 'गोवा ॲडव्होकेट्स प्रोटेक्शन बिल, २०२६' आवाजी मतदानाने मंजूर केले. वकिलांना व्यावसायिक कर्तव्य बजावताना हिंसा, धमकी, छळ, खोट्या गुन्ह्यात अडकविण्याचा प्रयत्न तसेच मालमत्तेच्या नुकसानीपासून संरक्षण देण्याची तरतूद या विधेयकात करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री तथा कायदा व न्यायमंत्री प्रमोद सावंत यांनी हे विधेयक मांडले. वकिलांना निर्भयपणे काम करता यावे आणि व्यावसायिक कामकाजामुळे त्यांच्यावर दबाव किंवा सूडबुद्धीने कारवाई होऊ नये, हा या कायद्याचा उद्देश आहे.

गंभीर दुखापतीस सात वर्षांपर्यंत शिक्षा

वकिलांवर हल्ला किंवा बेकायदेशीर बळाचा वापर केल्यास दोन वर्षांपर्यंत तुरुंगवास आणि ५५ हजार रुपयांपर्यंत दंड होऊ शकतो. गंभीर दुखापत केल्यास सात वर्षांपर्यंत तुरुंगवास आणि एक लाख रुपयांपर्यंत दंडाची तरतूद आहे. धमकी किंवा छळ केल्यास दोन वर्षांपर्यंत तुरुंगवास आणि २५ हजार रुपयांपर्यंत दंड होऊ शकतो. जीव घेण्याची, गंभीर दुखापत करण्याची किंवा मालमत्ता नष्ट करण्याची धमकी दिल्यास सात वर्षांपर्यंत तुरुंगवासाची तरतूद आहे.

**✦ खोट्या तक्रारीलाही लगाम**

वकिलांना संरक्षण देतानाच कायद्याच्या गैरवापरालाही आळा घालण्यात आला आहे. खोटी किंवा द्वेषपूर्ण तक्रार करणाऱ्या अथवा या कायद्याचा गैरवापर करणाऱ्या वकिलाला एक वर्षांपर्यंत तुरुंगवास, दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात.



**गुन्हा दाखल करण्यापूर्वी डीवायएसपी स्तरावर चौकशी**

वकील व्यावसायिक कर्तव्य बजावत असताना त्यांच्याविरुद्ध दखलपात्र गुन्ह्याची तक्रार झाल्यास थेट गुन्हा दाखल करता येणार नाही. प्रथम डीवायएसपी किंवा त्यापेक्षा वरिष्ठ अधिकाऱ्यामार्फत प्राथमिक चौकशी करावी लागेल. ही चौकशी सात दिवसांत पूर्ण करणे बंधनकारक असेल. गुन्हा दाखल झाल्यानंतर संबंधित बार कौन्सिल आणि वकिलाच्या बार असोसिएशनलाही त्याची माहिती द्यावी लागेल.

**✦ धमकी असल्यास पोलिस संरक्षण**

वकिलाला धोका असल्यास सत्र न्यायालयाकडे पोलिस संरक्षण मागता येणार आहे. न्यायालयाने संरक्षण मंजूर केल्यानंतर डीवायएसपीपेक्षा कनिष्ठ अधिकारी न्यायालयाच्या पूर्वपरवानगीशिवाय ते मागे घेऊ, कमी करू किंवा बंद करू शकणार नाही.

**✦ मालमत्तेचे नुकसान, वैद्यकीय खर्चाची भरपाई**

हल्ला किंवा धमकीमुळे वकिलाच्या मालमत्तेचे नुकसान झाल्यास तसेच उपचारासाठी खर्च झाल्यास त्याची भरपाई मिळण्याची तरतूद आहे. आरोपीकडून वसूल केलेल्या दंडातून भरपाई देण्याचा आदेश न्यायालय देऊ शकते.

**✦ सर्व गुन्हे दखलपात्र**

या कायद्यांतर्गत होणारे सर्व गुन्हे दखलपात्र असतील. मात्र, व्यावसायिक कर्तव्य बजावताना वकिलाविरुद्ध तक्रार झाल्यास गुन्हा नोंदविण्यापूर्वी डीवायएसपी स्तरावरील प्राथमिक चौकशीची विशेष तरतूद लागू राहील.

**✦ राज्यपालांच्या मंजुरीनंतर अंमलबजावणी**

'गोवा ॲडव्होकेट्स प्रोटेक्शन बिल, २०२६' हे विधेयक ३१ ऑगस्टला विधानसभेत मांडण्यात आले असून, १ सप्टेंबरला मंजूर झाले. आता राज्यपालांची मंजुरी आणि राजपत्रातील अधिसूचनेनंतर कायद्याची अंमलबजावणी होईल.

वकील हा न्याय देणारा घटक नसला तरी न्यायालयीन प्रक्रियेतील महत्त्वाचा सहभागी आहे. त्यामुळे वकिलांवरील हल्ला हा केवळ व्यक्तीवरील हल्ला न राहता न्यायप्रक्रियेवर परिणाम करणारा हस्तक्षेप ठरू शकतो. मात्र, वकिलांचे संरक्षण करताना त्यांच्या उत्तरदायित्वाचीही तितकीच जाणीव ठेवणे आवश्यक ठरणार आहे.

# लहुजी प्रतिष्ठानकडून ४१२ विद्यार्थ्यांचा गौरव

## ५५ गुणवंतांना पुरस्कार; कृष्णकुमार गोयल यांचे उच्च ध्येयाचे आवाहन



डेवलप्ड नेशन्स
developednationslaw@gmail.com

**पुणे :** क्रांतीवीर लहुजी वस्ताद प्रतिष्ठानच्या वतीने हिंदू मागासवर्गीय विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा बालगंधर्व रंगमंदिर येथे झाला. प्रारंभी स्वातंत्र्यलक्ष्मी झाशीच्या राणी लक्ष्मीबाई यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला.

उद्योगपती कृष्णकुमार गोयल यांनी विद्यार्थ्यांना उच्च ध्येय ठेवण्याचे आवाहन केले. तरुण वयात घेतलेले निर्णय भविष्य घडवतात, असे सांगत त्यांनी कॉसमॉस बँकेच्या संचालकपदापासून अध्यक्षपदापर्यंतचा प्रवास सांगितला. प्रतिष्ठानचे अध्यक्ष मिलिंदभाऊ एकबोटे यांनी गोळवलकर गुरुजींच्या विचारांतून प्रेरणा घेऊन ३६ वर्षांपासून उपक्रम सुरू असल्याचे सांगितले. सुदर्शन भारत सेवा फाउंडेशनचे योगेश देशपांडे यांनी विद्यार्थ्यांच्या विकासासाठी समाजाने सहकार्य करण्याचे आवाहन केले.

आद्यक्रांतिगुरू लहुजी वस्ताद यांचे वंशज किसन जाधव यांचा सत्कार करण्यात आला. बदलापूर येथील कार्यकर्ते सचिन गायकवाड यांना कृष्णकुमार गोयल यांच्या हस्ते चांदीचे कडे, स्मृतिचिन्ह व महावस्त्र देऊन गौरविण्यात आले. गायकवाड यांच्या कार्यामुळे १७४ हिंदू मुलींची 'घरवापसी' झाल्याचा दावा आयोजकांनी केला. त्यांच्या कार्यासाठी क्रांतीवीर लहुजी वस्ताद पुरस्कार देण्यात आला. सामाजिक कार्यकर्ते ॲड. विशाल काळे यांनी दिवंगत ज्येष्ठ विधिज्ञ मोहनराव डोंगरे यांच्या स्मरणार्थ रोख पारितोषिक दिले. गुणवंत विद्यार्थिनी कु. मानवी मनीष मोरे हिला पूजनीय गोळवलकर गुरुजी पुरस्कार, २१ हजार रुपये, स्मृतिचिन्ह व महावस्त्र देण्यात आले. कु. वैभवी सपकाळ, कु. ऋषिकेश जगताप, कु. लावण्या जोशी, कु. जान्हवी निकमबे आणि कु. साई वायादांडे यांना अनुक्रमे लालबहादूर शास्त्री, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, उमाजी नाईक, संत रोहिदास आणि स्वातंत्र्यवीर सावरकर पुरस्कार प्रदान करण्यात आले.

९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या ५५ विद्यार्थ्यांना प्रत्येकी एक हजार रुपये व शिवचरित्र, तर एसएससीमध्ये यशस्वी झालेल्या ४१२ विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देण्यात आले. कार्यक्रमाचे निवेदन दीपक पाटील यांनी केले. राजू जाधव, अभिजित पंतगे, पराग शिवदास, राजू मुथा, अभिषेक वाघमोडे यांच्यासह शंभरहून अधिक कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. समन्वय मंगेश नलावडे यांनी केला. पंडित दीनदयाळ उपाध्याय पतसंस्थेचे विशेष सहकार्य लाभले.

# बहिणीसाठी लढलो; वकिलीचा अर्थ कळला!

## माझा पहिला खटला : कायद्याच्या पुस्तकापलीकडे माणसाची बाजू समजून घेण्याचा प्रवास

**वकिली हा केवळ व्यवसाय नाही; ती माणसाकडे, त्याच्या प्रश्नांकडे आणि अन्यायाकडे पाहण्याची एक दृष्टी आहे. कायद्याची पदवी मिळाल्यानंतर कोणत्या क्षेत्रात काम करायचे, याचा निर्णय लगेच घेण्यापेक्षा न्यायालयात येणाऱ्या विविध प्रकारच्या प्रकरणांचा अनुभव घ्यायला हवा. कारण कायद्याच्या क्षेत्रातही पंचपक्वानांचे ताट समोर असते; त्यातील प्रत्येक पदार्थ चाखल्याशिवाय आपल्याला नेमके काय आवडते, हे कळत नाही. माझ्या वकिलीच्या प्रवासाची सुरुवातही अशाच शोधातून झाली आणि पहिल्याच खटल्याने मला कायद्यापेक्षा ‘माणूस’ समजून घेण्याचा धडा दिला.**

पिंपरीतील डी. वाय. पाटील महाविद्यालयात २००८ ते २०१३ या काळात एलएलबीचे शिक्षण घेत असताना मूट कोर्टमध्ये उत्साहाने सहभागी होत होतो. पुस्तकातील कायदा समजून घेण्यापेक्षा तो प्रत्यक्ष न्यायालयीन प्रक्रियेत कसा वापरायचा, याची उत्सुकता अधिक होती. शिक्षक, सहकारी आणि मित्रांकडून विषयातील बारकावे, वेगळेपणा, नावीन्य आणि भविष्यातील संधी समजून घेता आल्या. त्याच काळात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातून एलएलएमचे शिक्षणही पूर्ण केले.

वकिली सुरू करण्यापूर्वी तीन-चार इंटर्नशिप केल्या. सुरुवातीला सिव्हिल प्रकरणांमध्ये काम करायला सुरुवात केली. मात्र, एखाद्या विशिष्ट क्षेत्राची चौकट स्वतःभोवती आखून घेतली नाही. समोर येणारे प्रकरण समजून घ्यायचे, त्यातील कायदा अभ्यासायचा आणि शक्य तितके शिकायचे, हा दृष्टिकोन ठेवला. त्याचा फायदा झाला. कधी तोटा झाला, चुका झाल्या; पण प्रत्येक अनुभवाने काहीतरी शिकवले. सिव्हिलसोबत क्राईमच्या प्रकरणांमध्ये काम करण्याची संधी मिळाली. त्यातील बारकावे समजू लागले. त्या काळात मुंबईत जाऊन उच्च न्यायालयात प्रॅक्टिस करावी, असेही वाटत होते. मात्र, इंटर्नशिप आणि सुरुवातीच्या कामातूनच आपल्या आवडी-निवडींबाबत हळूहळू स्पष्टता निर्माण होत गेली.

सिन्नरच्या न्यायालयातील पहिला खटला मात्र आजही विसरता येत नाही. तो क्राईमशी संबंधित होता आणि एका बहिणीच्या हक्कासाठी लढायचा होता. भावाने फसवणूक करून बहिणीच्या नावावरील मालमत्ता स्वतःच्या नावावर करून घेतली होती. न्याय मिळावा म्हणून बहिणीने पोलिसांकडे धाव घेतली; मात्र तिच्या तक्रारीची अपेक्षित दखल घेतली जात नव्हती. त्या वेळी तिच्या वतीने न्यायालयात अर्ज दाखल केला.



**ॲड. हर्षद ननावरे**
शिवाजीनगर जिल्हा व सत्र न्यायालय तसेच पिंपरी न्यायालय येथे सिव्हिल, क्राईम, रेरा आणि कॉर्पोरेट क्षेत्रात प्रॅक्टिस

हा माझ्यासाठी पहिलाच मोठा कसोटीचा क्षण होता. प्रकरणाची पूर्ण तयारी केली. संबंधित कायदे, अनेक केस लॉ आणि न्यायालयीन निर्णयांचा अभ्यास केला. न्यायालयासमोर तब्बल अर्ध्या तासाहून अधिक काळ युक्तिवाद केला. आपली बाजू कायद्याच्या चौकटीत ठामपणे मांडताना मनात एकच विचार होता—समोर उभ्या असलेल्या व्यक्तीला न्याय मिळायला हवा. न्यायाधीशांनीही युक्तिवादाला प्रोत्साहन दिले आणि आत्मविश्वास वाढवला.

युक्तिवाद संपल्यानंतरही खरी परीक्षा बाकी होती. न्यायालयीन कामकाज संपत आले होते. तरीही सायंकाळपर्यंत न्यायालयात थांबून आदेशाची प्रतीक्षा केली. अखेर न्यायालयाने पोलिसांना भावाविरुद्ध एफआयआर दाखल करण्याचे आदेश दिले. त्या क्षणी मिळालेला आनंद केवळ पहिला खटला जिंकल्याचा नव्हता; कायद्याच्या माध्यमातून एखाद्या अन्यायग्रस्त व्यक्तीला आवाज देता येतो, याची झालेली ती पहिली ठोस जाणीव होती.

त्या एका प्रकरणाने पुढच्या प्रवासाला आत्मविश्वास दिला. त्यानंतर सिव्हिल, क्राईम, रेरा, एनजीटी, सहकारी संस्था आणि कॉर्पोरेट अशा विविध क्षेत्रांमध्ये काम करण्याची संधी मिळाली. सहकाऱ्यांमुळे अनेक नवी प्रकरणे हाताळता आली. पक्षकारांकडून व्यवहार समजला, ज्युनिअर्सकडून नवे प्रश्न समोर आले, न्यायालयाकडून शिस्त आणि वकिलांकडून युक्तिवादाचे अनेक पैलू शिकता आले.

वकील म्हणून आपली भूमिका केवळ आपल्या पक्षकाराची बाजू मांडण्यापुरती मर्यादित नसते. प्रकरणाच्या दोन्ही बाजू समजून घेऊन कायदा काय सांगतो, योग्य काय आहे आणि न्यायालयासमोर कोणती बाब ठोसपणे मांडली पाहिजे, याचा विचार करावा लागतो. त्यासाठी अभ्यास, तयारी आणि प्रचंड मेहनतीला पर्याय नाही. न्यायालयात आत्मविश्वासाने उभे राहण्यापूर्वी त्या आत्मविश्वासामागे तितकाच सखोल अभ्यास असावा लागतो.

२०१७ मध्ये रेरा कायदा आला आणि या नव्या क्षेत्रातही पूर्ण तयारीने उतरण्याचा निर्णय घेतला. नवीन कायदा म्हणजे नवीन संधी, असे न पाहता नवीन कायदा म्हणजे नव्याने शिकण्याची जबाबदारी, या भूमिकेतून काम केले. त्यातून या क्षेत्रातही चांगले काम करता आले आणि ओळख निर्माण झाली. आज वकिलीच्या प्रवासाला बारा वर्षे पूर्ण होत असताना मागे वळून पाहताना जाणवते की सुरुवातीला कोणते क्षेत्र निवडायचे, याचा निर्णय न घेतल्याचा फायदा झाला. कारण त्या काळात विविध विषय समजून घेता आले.

नवोदित वकिलांना माझे एकच सांगणे आहे—उमेदीच्या काळात लगेच ‘नाही’ म्हणायला शिकू नका. तुमच्यासमोर कोणत्याही विषयाचे प्रकरण आले, तर त्यात रस घ्या. ते समजून घ्या. अभ्यास करा. प्रत्येक प्रकरण आपल्यासाठी शिकण्याची संधी आहे. कालांतराने कोणत्या क्षेत्रात काम करायचे, कोणत्या विषयात आपली खरी ताकद आहे, याचा उलगडा आपोआप होतो. सुरुवातीलाच स्वतःला एका चौकटीत बंदिस्त करून घेणे योग्य नाही.

आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे एआयकडेही याच दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे. एआयला विरोध करण्यापेक्षा आपल्या क्षेत्रात त्याचा योग्य वापर कसा करता येईल, हे महत्त्वाचे आहे. तंत्रज्ञानातील बदल टाळता येत नाहीत; त्यांना समजून घेऊन आपल्या प्रगतीसाठी त्यांचा उपयोग करणे ही काळाची गरज आहे. त्यामुळे एआय हा वकिलांसाठी धोका नसून योग्य वापर केला, तर मोठी संधी ठरू शकतो.

मात्र तंत्रज्ञानाचा वापर करताना वाचनाची जागा कोणतीही गोष्ट घेऊ शकत नाही. नवोदितांनी दिवसभर सोशल मीडियावरील रिल्स पाहण्यात वेळ घालवण्यापेक्षा केस लॉ वाचावेत, निर्णयांचा अभ्यास करावा आणि ज्या क्षेत्रात काम करायचे आहे, त्या क्षेत्राशी संबंधित साहित्य वाचावे. ‘काहीतरी वाचणे’ आणि ‘आपल्या कामाला उपयोगी असे वाचणे’ यात मोठा फरक आहे. वेळ अमूल्य आहे; तो कुठे खर्च करायचा, हे प्रत्येक वकिलाने ठरवले पाहिजे. वकिलीच्या बारा वर्षांच्या प्रवासात मला एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली—कायद्याची पुस्तके आपल्याला नियम सांगतात; पण न्यायालय आपल्याला माणूस समजायला शिकवते. माझ्या पहिल्या खटल्यातील ती बहिण आजही आठवते. तिच्या मालमत्तेचा प्रश्न हा फक्त कागदपत्रांचा विषय नव्हता; तो तिच्या हक्काचा, विश्वासाचा आणि अन्यायाविरुद्ध उभे राहण्याचा प्रश्न होता. त्या दिवशी न्यायालयाने एफआयआरचे आदेश दिले आणि माझ्या वकिलीच्या प्रवासाला खऱ्या अर्थाने दिशा मिळाली. म्हणूनच वकिली माझ्यासाठी केवळ व्यवसाय नाही. ती रोजच्या जगण्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन आहे. कायदा शिकताना कलमे समजतात; पण त्यांचा वापर करताना माणूस समजतो. आणि शेवटी न्यायालयात उभा असलेला प्रत्येक खटला हा केवळ दोन पक्षांमधील कायदेशीर संघर्ष नसतो; त्या मागे कुणाचे तरी आयुष्य, हक्क, स्वप्न आणि कधी कधी संपूर्ण कुटुंबाचे भविष्य उभे असते. हे समजले, तरच काळा कोट खऱ्या अर्थाने जबाबदारीचे वस्त्र बनतो.

**शब्दांकन : ॲड. युगंधर ताजणे**

# चार बेस, चार टॉपच! डीजेला पुणे पोलिसांचा ‘डोस’

## दहीहंडी, गणेशोत्सवासह सर्वच उत्सवांसाठी ध्वनिप्रदूषणावर पोलिसांची कडक नजर

डेवलप्ड नेशन्स
developednationslaw@gmail.com

**पुणे :** डीजेच्या दणदणाटाने पुणेकरांच्या कानाला आता ‘विश्रांती’ मिळणार आहे. दहीहंडी, गणेशोत्सवासह वर्षभरातील सर्व सण-उत्सवांसाठी जास्तीत जास्त चार बेस आणि चार टॉप वापरण्याचीच परवानगी असेल. नियमांचे उल्लंघन केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल, असा स्पष्ट इशारा पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांनी दिला.

गणेश कला क्रीडा मंच येथे दहीहंडी व गणेशोत्सव मंडळांच्या समन्वय बैठकीत ते बोलत होते. महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रजित नायर यांच्यासह पोलीस, महापालिका अधिकारी आणि मंडळांचे पदाधिकारी उपस्थित होते. शहरात वर्षभर सुमारे १०० दिवस विविध सण, उत्सव आणि कार्यक्रम होत असल्याने ध्वनिप्रदूषणाचा प्रश्न गंभीर बनला आहे. त्यामुळे सर्व उत्सवांसाठी ध्वनिव्यवस्थेबाबत एकच नियम लागू केला जाणार आहे.

प्लाझ्मा, प्रेशर मिड आणि सहा-आठ बेस-टॉपच्या भिंतीमुळे ध्वनीची पातळी १०० ते १०५ डेसिबलपर्यंत पोहोचते. त्यामुळे प्लाझ्मा, प्रेशर मिड आणि लेझर लाइटचा वापर टाळण्याचा मंडळांचा निर्णय कौतुकास्पद असल्याचे आयुक्तांनी सांगितले. उत्सवाचा आनंद साजरा करताना नागरिकांना त्रास होणार नाही, याची दक्षता घेण्याचे आवाहन त्यांनी केले.

### पाच दिवस मध्यरात्रीपर्यंत



गणेशोत्सवातील १९, २०, २२, २३ आणि २५ सप्टेंबर रोजी रात्री १२ वाजेपर्यंत ध्वनिक्षेपकांना परवानगी असेल. अन्य दिवशी रात्री १० वाजेपर्यंतच ध्वनिक्षेपक वाजवता येतील. आक्षेपार्ह नृत्य सादरीकरणालाही परवानगी नसेल.

### ‘एसी’ कक्षातून कारभार नको

सर्व पोलीस ठाण्यांच्या प्रभारी अधिकाऱ्यांनी मंडळांच्या कार्यकर्त्यांसोबत प्रत्यक्ष बैठका घेऊन वाहतूक, गर्दी नियंत्रण आणि महिला-बालकांच्या सुरक्षेचे नियोजन करावे. ‘एसी’ कक्षात बसून निर्णय घेऊ नका, अशा सूचना आयुक्तांनी दिल्या. अर्ज प्राप्त झाल्यानंतर २४ तासांत परवानग्या देण्याचे आदेशही त्यांनी दिले.

लक्ष्मी रस्ता आणि टिळक रस्त्यावरील मिरवणुकांसाठी स्वतंत्र समिती स्थापन करण्यात येणार असून, वेळेपेक्षा मिरवणुकीची सुरक्षितता आणि गर्दी नियंत्रणाला प्राधान्य दिले जाणार आहे. मंडळांनी अमली पदार्थविरोधी मोहिमेत सहभागी होऊन प्रबोधनात्मक देखावे सादर करावेत, असे आवाहनही आयुक्तांनी केले.

# यूट्यूबवरील आक्षेपार्ह व्हिडिओप्रकरणी पोलिसांची कारवाई

**पुणे :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील आणि पुणे महापालिकेच्या विधी समिती सदस्या मिताली साळवेकर यांच्याबाबत यूट्यूबवर अश्लील व आक्षेपार्ह वक्तव्ये केल्याप्रकरणी संतोष पंडित (४५) याला कोथरूड पोलिसांनी गुरुवारी रात्री अटक केली. सोशल मीडियावर आक्षेपार्ह व्हिडिओ प्रसारित करून महिलांचा विनयभंग आणि मंत्र्यांची बदनामी केल्याचा आरोप त्याच्यावर आहे. याप्रकरणी सारिका राम कांबळे (३६) यांनी पोलिसांकडे तक्रार दिली. २ सप्टेंबर रोजी यूट्यूबवरील ‘@SantoshPandit6278’ या खात्यावरील व्हिडिओ त्यांच्या निदर्शनास आला. त्यामध्ये चंद्रकांत पाटील आणि मिताली साळवेकर यांच्याबाबत अश्लील व लैंगिक स्वरूपाची शेरेबाजी केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

# ‘Dr.’ पुरेसे नाही; उपचाराचा अधिकार कुठून आला?

## पदवी, नोंदणी आणि प्रशिक्षणापलीकडे उपचाराचा कायदेशीर अधिकार नेमका किती?

**डॉक्टरच्या नावापुढे ‘Dr.’ दिसले की रुग्ण निश्चिंत होतो. पण त्या दोन अक्षरांआड कोणती पदवी आहे, कोणत्या वैद्यकीय प्रणालीची नोंदणी आहे आणि नेमका कोणता उपचार करण्याचा कायदेशीर अधिकार आहे, हा प्रश्न बहुतेकदा विचारलाच जात नाही. BAMS, BHMS, MBBS, BUMS अशा पदव्या वेगवेगळ्या असताना उपचाराचा अधिकारही आपोआप समान ठरत नाही. म्हणूनच prescription हातात पडल्यावर ‘औषध काय आहे?’ एवढेच नव्हे, तर ‘हे औषध लिहिण्याचा अधिकार नेमका कुणाला आहे?’ हा प्रश्नही रुग्णाने विचारण्याची वेळ आली आहे.**

वैद्यकीय पदवी असणे आणि प्रत्येक प्रकारचा उपचार करण्याचा कायदेशीर अधिकार असणे, या दोन स्वतंत्र बाबी आहेत. महाराष्ट्रात BAMS डॉक्टरांच्या allopathic practice संदर्भात Maharashtra Medical Practitioners Act, 1961 मधील Section 25(iv) महत्त्वाचे ठरते. काही विशिष्ट पात्रता आणि नोंदणी असलेल्या Indian Medicine practitioners ना modern scientific medicine करण्याचा अधिकार कायद्याने दिला आहे; मात्र तो त्यांच्या संबंधित trainingच्या मर्यादेपर्यंत आहे. त्यामुळे ‘BAMS म्हणजे allopathy बेकायदेशीर’ किंवा ‘BAMS डॉक्टरांना MBBSप्रमाणे सर्व allopathic उपचार करता येतात’, हे दोन्ही सरसकट निष्कर्ष चुकीचे ठरू शकतात.

BHMSच्या बाबतीतही अशीच कायदेशीर गुंतागुंत आहे. BHMS आणि BHMSसोबत Certificate Course in Modern Pharmacology (CCMP) केलेला practitioner यांच्यात फरक आहे. महाराष्ट्रातील लागू कायदेशीर तरतुदींनुसार विशिष्ट अटी पूर्ण करणाऱ्या registered homoeopathic practitionersना modern scientific medicineच्या मर्यादित वापराची तरतूद आहे. मात्र CCMP म्हणजे MBBSची समकक्ष पदवी नव्हे आणि त्यातून अमर्याद allopathic practiceचा अधिकारही मिळत नाही. इथेही qualification, registration, training आणि कायद्याने निश्चित केलेला scope हे चार मुद्दे निर्णायक ठरतात.

‘Registered Medical Practitioner’ या शब्दाभोवतीही गैरसमज आहेत. Drugs and Cosmetics Rulesमध्ये हा शब्द वापरला जातो; मात्र सर्वोच्च न्यायालयाने Dr. Mukhtiar Chand v. State of Punjab या निर्णयात स्पष्ट केले की या संज्ञेमुळे स्वतःहून modern medicine करण्याचा substantive अधिकार मिळत नाही. तो अधिकार संबंधित medical-practice lawमधून येतो. म्हणजे एखादे औषध prescriptionवर लिहिता येते का आणि ते औषध लिहिण्याचा कायदेशीर अधिकार त्या व्यक्तीला आहे का, हे दोन स्वतंत्र प्रश्न आहेत.



**अॅड. संदेश दराडे**
B.A., LL.B. | LL.M.
(London, UK)

Schedule H, H1 किंवा Xमधील औषध दिसले की ‘हे फक्त MBBS डॉक्टरच लिहू शकतात’ असा निष्कर्ष काढणेही योग्य नाही. या schedulesचा संबंध औषधांच्या विक्री, prescription आणि नियामक नियंत्रणाशी आहे. प्रत्यक्ष प्रश्न पुन्हा तोच—ज्या practitionerने औषध लिहिले, त्याला लागू कायद्यानुसार तो उपचार करण्याचा अधिकार आहे का?

याच ठिकाणी Poonam Verma v. Ashwin Patel हा सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय महत्त्वाचा ठरतो. ज्या medical systemमध्ये practice करण्याचा कायदेशीर अधिकार नाही, त्या प्रणालीतील उपचार करणे गंभीर ठरू शकते, हा त्यातील मूलभूत संदेश आहे. मात्र महाराष्ट्रातील नंतरच्या कायदेशीर तरतुदी आणि विशिष्ट practitionersना मिळालेल्या मर्यादित अधिकारांकडे दुर्लक्ष करून हा निर्णय प्रत्येक BAMS किंवा BHMS practitionerला अक्षरशः लागू करणेही योग्य ठरणार नाही.

कायद्याने उपचार करण्याचा अधिकार दिला आहे, याचा अर्थ उपचार नेहमीच योग्य ठरतो, असेही नाही. चुकीचे निदान, चुकीचा उपचार किंवा आवश्यक काळजीचा अभाव असेल, तर वैद्यकीय निष्काळजीपणाची जबाबदारी निर्माण होऊ शकते. त्यामुळे प्रत्येक प्रकरणात दोन प्रश्न स्वतंत्रपणे तपासावे लागतात—उपचार वैद्यकीयदृष्ट्या योग्य होता का आणि तो उपचार करण्याचा कायदेशीर अधिकार संबंधित practitionerकडे होता का?

सामान्य रुग्णाला कायद्याची कलमे पाठ असण्याची गरज नाही. मात्र डॉक्टरची qualification, registration, medical system आणि अतिरिक्त qualification यांची माहिती घेणे हा त्याचा अधिकार आहे. डॉक्टरच्या clinicमध्ये ही माहिती स्पष्टपणे उपलब्ध असणे ही पारदर्शकतेची प्राथमिक अट ठरली पाहिजे. Cross-system practiceच्या बाबतीत अधिकाराची मर्यादा काय आहे, हेही रुग्णाला सहज समजेल अशा पद्धतीने सांगितले गेले पाहिजे. या विषयाकडे ‘BAMS विरुद्ध MBBS’ किंवा ‘BHMS विरुद्ध MBBS’ अशा संघर्षाच्या चौकटीत पाहणे चुकीचे आहे. प्रश्न पदवी मोठी कोणाची, हा नाही; प्रश्न आहे—रुग्णावर उपचार करणाऱ्या व्यक्तीकडे त्या उपचारासाठी कायदेशीर अधिकार, आवश्यक प्रशिक्षण आणि अपेक्षित कौशल्य आहे का? सरकार आणि नियामक संस्थांनी cross-system practice, CCMP आणि उपचाराच्या scopeबाबत अधिक स्पष्ट, सुस्पष्ट आणि सार्वजनिक मार्गदर्शक तत्त्वे देणे आवश्यक आहे. शेवटी, डॉक्टरच्या नावापुढे ‘Dr.’ असणे हा विश्वासाचा प्रारंभ असू शकतो; पण तो उपचाराच्या अधिकाराचा अंतिम पुरावा नाही. रुग्णाने prescriptionकडे पाहताना औषधाचे नाव वाचावेच; त्याआधी ते औषध लिहिणाऱ्या व्यक्तीची पात्रता आणि कायदेशीर अधिकारही समजून घ्यावा. कारण आरोग्याच्या बाबतीत अंधविश्वास नव्हे, तर माहितीपूर्ण विश्वास अधिक सुरक्षित असतो.

# डीजे लावणीवर रंगभूमी मंडळाचा अंकुश?

## पोलिसांना कार्यक्रमांच्या परवानगीपूर्वी ‘योग्यता प्रमाणपत्र’ तपासण्याच्या सूचना; अश्लील कार्यक्रमांवर नियंत्रणासाठी स्वतंत्र यंत्रणेची मागणी

डेवलप्ड नेशन्स
developednationslaw@gmail.com

**पुणे :** राज्यातील वाढत्या अश्लील डीजे लावणी कार्यक्रमांना आळा घालण्यासाठी कार्यक्रमांच्या परवानगी प्रक्रियेत रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळाच्या ‘योग्यता प्रमाणपत्रा’चा समावेश करण्याची मागणी पुढे आली आहे. यासंदर्भात राष्ट्रवादी काँग्रेसच्या चित्रपट, साहित्य, कला व सांस्कृतिक विभागाचे प्रदेशाध्यक्ष बाबासाहेब पाटील यांनी सांस्कृतिक कार्य विभागाकडे निवेदन दिले असून, त्यानुसार पोलिस आयुक्त आणि जिल्हा पोलिस अधीक्षकांना योग्य त्या सूचना देण्याबाबत हालचाली सुरू झाल्याचे मुंबई येथील रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळाच्या पत्रातून स्पष्ट झाले आहे.

राज्यात विविध सार्वजनिक कार्यक्रम, यात्रा, उत्सव आणि सांस्कृतिक सोहळ्यांच्या निमित्ताने लावणी, लोकनाट्य, तमाशा, लोकसंगीत तसेच डीजेच्या माध्यमातून मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित केले जातात. मात्र, या कार्यक्रमांच्या नावाखाली अश्लीलता, आक्षेपार्ह हावभाव आणि समाजमनावर विपरीत परिणाम करणाऱ्या सादरीकरणाबाबत गेल्या काही काळापासून प्रश्न उपस्थित होत आहेत. मनोरंजनाच्या नावाखाली सांस्कृतिक कलेचे विद्रूपीकरण होऊ नये आणि पारंपरिक लोककलेचे स्वरूप कायम राहावे, यासाठी कार्यक्रमांच्या पूर्वपरीक्षणाची यंत्रणा अधिक प्रभावी करण्याची गरज व्यक्त होत आहे.

बाबासाहेब पाटील यांनी २९ जुलै २०२६ रोजी सांस्कृतिक कार्य विभागाच्या सचिवांकडे पाठविलेल्या पत्रात राज्यात वाढत चाललेल्या अश्लील डीजे लावणी कार्यक्रमांवर नियंत्रण ठेवण्यासाठी स्वतंत्र सेन्सॉर बोर्ड अथवा नियंत्रण समिती स्थापन करण्याची मागणी केली होती. त्यानंतर पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या ३० जुलै २०२६ रोजीच्या पत्राचा संदर्भ देत रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळाने राज्यातील पोलिस प्रशासनाला याबाबतची कार्यपद्धती स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

मंडळाच्या पत्रानुसार, सांस्कृतिक कार्य विभागाकडून प्राप्त निर्देशांच्या अनुषंगाने डीजे लावणी कार्यक्रमांसाठी मंडळाकडून ‘योग्यता प्रमाणपत्र’ प्राप्त करून घेण्याची प्रक्रिया लागू करण्याचा मुद्दा पुढे आला आहे. अशा कार्यक्रमांना परवानगी देण्यापूर्वी संबंधित कार्यक्रमाची सामग्री, सादरीकरणाचे स्वरूप आणि त्यातील आक्षेपार्ह बाबी तपासून निर्णय घेण्याची जबाबदारी निश्चित करण्याबाबत पोलिस आयुक्त आणि जिल्हा पोलिस अधीक्षकांना रंगभूमी मंडळाच्या कार्यालयाच्या स्तरावरून योग्य त्या सूचना देण्याचे सुचविण्यात आले आहे.

मंडळाने आपल्या पत्रात रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळाची कायदेशीर पार्श्वभूमीही स्पष्ट केली आहे. मुंबई पोलिस अधिनियम, १९५१ मधील कलम ३३ (१) (वा) (iii) अन्वये ५ जानेवारी १९५४ रोजीच्या अधिसूचनेनुसार गृह विभागामार्फत रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळाची स्थापना करण्यात आली. चित्रपट वगळता सार्वजनिक मनोरंजनाची ठिकाणे, सार्वजनिक मनोरंजनाचे प्रयोग, मेळे आणि अशा स्वरूपाच्या कार्यक्रमांना परवानगी देणे, त्यांच्यावर नियंत्रण ठेवणे आणि त्यासाठीची कार्यपद्धती निश्चित करण्याची तरतूद संबंधित नियमांमध्ये करण्यात आली आहे.

या संदर्भात १९६० मधील नियम तसेच १९७४ मध्ये करण्यात आलेल्या सुधारित नियमांमधील नियम क्रमांक १३५ ते १४५ यांचा आधार मंडळाने घेतला आहे. त्यानुसार नाटक, एकांकिका, लोकनाट्य, तमाशा, लावणी, लोकसंगीत, वग, मेळे आदी सार्वजनिक ठिकाणी सादर होणाऱ्या मनोरंजनाच्या कार्यक्रमांसाठी नागरिकांकडून सादर करण्यात आलेल्या लिखित संहितेचे मंडळाच्या अशासकीय सदस्यांकडून पूर्वपरीक्षण केले जाते. त्यानंतर अध्यक्षांच्या मान्यतेने संबंधित कार्यक्रमाला कायमस्वरूपी योग्यता प्रमाणपत्र देण्याची पद्धत असल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे. यामुळे डीजे लावणीच्या नावाखाली सादर होणाऱ्या कार्यक्रमांवर नियंत्रण आणताना केवळ पोलिस परवानगी पुरेशी आहे का, की सांस्कृतिक स्वरूप आणि कार्यक्रमातील आशयाची स्वतंत्र छाननी आवश्यक आहे, हा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. पोलिसांची जबाबदारी प्रामुख्याने कायदा व सुव्यवस्था राखण्याची असताना कार्यक्रमातील सांस्कृतिक आशय, सादरीकरणातील अश्लीलता किंवा आक्षेपार्ह मजकूर तपासण्यासाठी स्वतंत्र तज्ज्ञ यंत्रणेची आवश्यकता असल्याचे या पत्रव्यवहारातून अधोरेखित होते. विशेषतः लावणी ही महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीचा अविभाज्य भाग आहे. शाहिरी परंपरा, तमाशा आणि लोककलांच्या माध्यमातून सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक आशय जनमानसापर्यंत पोहोचविण्याचे काम या कलेने केले आहे. त्यामुळे ‘लावणी’ या पारंपरिक कलेचे नाव वापरून केवळ उत्तेजक सादरीकरण किंवा अश्लील मनोरंजनाला प्रोत्साहन मिळत असेल, तर त्याचा फटका संपूर्ण लोककला परंपरेला बसू शकतो. अशा परिस्थितीत नियंत्रणाचा उद्देश कला बंद करणे नसून तिचे सांस्कृतिक स्वरूप आणि सार्वजनिक शिस्त जपणे हा असणे आवश्यक आहे. रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळाच्या पत्रामुळे आता डीजे लावणी कार्यक्रमांच्या परवानगी प्रक्रियेत मंडळाचे योग्यता प्रमाणपत्र कितपत बंधनकारक राहणार, त्यासाठी कोणती कागदपत्रे आवश्यक असतील, पोलिस प्रशासन आणि मंडळ यांच्यातील समन्वय कसा राहील आणि प्रमाणपत्राशिवाय कार्यक्रम झाल्यास आयोजकांवर कोणती कारवाई होईल, याबाबत स्पष्टता अपेक्षित आहे. सध्या पत्रव्यवहारात या प्रक्रियेबाबत सूचना करण्यात आल्या असल्या तरी प्रत्यक्ष अंमलबजावणीची सविस्तर कार्यपद्धती स्पष्ट होणे आवश्यक आहे. अश्लीलतेला आळा घालण्याच्या नावाखाली पारंपरिक लोककलेवरच निर्बंध येऊ नयेत आणि स्वातंत्र्याच्या नावाखाली सार्वजनिक संस्कृतीचे अवमूल्यनही होऊ नये, यामधील समतोल राखणे प्रशासनासमोरील खरी कसोटी ठरणार आहे. डीजेचा आवाज वाढवून लावणीची लोकप्रियता वाढविण्यापेक्षा लावणीच्या आशयाची, काव्याची आणि कलात्मकतेची उंची वाढविणे हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशाचा खरा सन्मान ठरेल. त्यामुळे प्रस्तावित नियंत्रण व्यवस्था केवळ ‘परवानगी’पुरती न राहता पारदर्शक, स्पष्ट आणि सर्व कार्यक्रमांना समान निकष लावणारी असेल का, याकडे आता सांस्कृतिक क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

# अंबाजोगाई न्यायालयात न्यायाधीशांच्या सक्तीच्या सेवानिवृत्तीने खळबळ

## अतिरिक्त सत्र न्यायाधीश डॉ. रचना तेहरा यांच्यावर कारवाई

**मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार बीडच्या प्रमुख जिल्हा न्यायाधीशांकडून आदेशाची अंमलबजावणी**

डेवलप्ड नेशन्स
developednationslaw@gmail.com

**अंबाजोगाई :** येथील जिल्हा व सत्र न्यायालयात न्यायालयीन कामकाज सुरू असतानाच अतिरिक्त सत्र न्यायाधीश डॉ. रचना तेहरा यांना गुरुवारी सक्तीची सेवानिवृत्ती देण्यात आल्याने न्यायालयीन व विधी वर्तुळात मोठी खळबळ उडाली. मुंबई उच्च न्यायालयाच्या थेट निर्देशानुसार ही कारवाई करण्यात आल्याचे समोर आले आहे. बीडचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश स्वतः अंबाजोगाई येथे उपस्थित राहून या आदेशाची अंमलबजावणी केल्याने या कारवाईचे गांभीर्य अधिक अधोरेखित झाले आहे.

न्यायालयीन कामकाज सुरळीत सुरू असताना अचानक झालेल्या या कारवाईमुळे अंबाजोगाई न्यायालयातील न्यायिक अधिकारी, कर्मचारी तसेच विधी क्षेत्रातील व्यक्तींमध्ये चर्चेला उधाण आले. विशेष म्हणजे, राष्ट्रीय लोकअदालतीच्या पूर्वतयारीसाठी न्यायालयात महत्त्वाची बैठक सुरू असतानाच ही कारवाई करण्यात आली. त्यामुळे न्यायालयीन प्रशासनातील या घडामोडीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे.

गुरुवारी सकाळच्या सत्रात डॉ. रचना तेहरा यांच्या अध्यक्षतेखाली आगामी राष्ट्रीय लोकअदालतीच्या पूर्वतयारीसाठी न्यायाधीश, भूसंपादन अधिकारी आणि संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली होती. बैठकीत राष्ट्रीय लोकअदालतीसाठी प्रलंबित प्रकरणे, त्यांचे संभाव्य तडजोडीने निवारण, संबंधित विभागांमधील समन्वय आणि आवश्यक पूर्वतयारी याबाबत चर्चा करण्यात आली. बैठक संपल्यानंतर डॉ. तेहरा नेहमीप्रमाणे न्यायालयीन कामकाजासाठी आपल्या दालनात गेल्या असताना बीडचे प्रमुख जिल्हा न्यायाधीश यांच्या पथकाने तेथे जाऊन सक्तीच्या सेवानिवृत्तीच्या आदेशाची अंमलबजावणी केली.



मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार झालेल्या या कारवाईमुळे न्यायालयीन वर्तुळात विविध प्रश्न उपस्थित झाले आहेत. मात्र, संबंधित आदेशामागील कारणे किंवा प्रशासनाकडून करण्यात आलेल्या कारवाईची सविस्तर पार्श्वभूमी अधिकृतरीत्या स्पष्ट झालेली नाही. त्यामुळे या प्रकरणाबाबत तर्क-वितर्क करण्याऐवजी अधिकृत आदेशातील बाबी आणि न्यायालयीन प्रशासनाकडून उपलब्ध होणारी माहिती महत्त्वाची ठरणार आहे.

न्यायालयीन अधिकाऱ्याला सक्तीची सेवानिवृत्ती देणे ही नियमित प्रशासकीय प्रक्रिया नसून अत्यंत गंभीर स्वरूपाची कारवाई मानली जाते. अशा कारवाईमुळे संबंधित न्यायिक अधिकाऱ्याच्या सेवाविषयक स्थितीवर थेट परिणाम होतो. त्यामुळे या निर्णयामागील प्रशासकीय व न्यायिक प्रक्रियेबाबत विधी क्षेत्रात स्वाभाविकच उत्सुकता निर्माण झाली आहे.

अंबाजोगाई येथील न्यायालयात राष्ट्रीय लोकअदालतीच्या पूर्वतयारीसाठी बैठक सुरू असताना दुसरीकडे सक्तीच्या सेवानिवृत्तीच्या आदेशाची अंमलबजावणी होणे ही या घटनेची विशेष बाब ठरली. न्यायालयीन कामकाज, प्रशासन आणि शिस्त या तिन्ही बाबींच्या दृष्टीने या कारवाईकडे पाहिले जात आहे. न्यायव्यवस्थेवरील नागरिकांचा विश्वास हा केवळ निकालांवर नव्हे, तर न्यायालयीन प्रशासनातील पारदर्शकता, शिस्त आणि उत्तरदायित्वावरही अवलंबून असतो. त्यामुळे अशा कारवाईची कारणमीमांसा अधिकृतरीत्या स्पष्ट होणे हीदेखील तितकीच महत्त्वाची बाब आहे.

दरम्यान, बीडचे प्रमुख जिल्हा न्यायाधीश आपल्या पथकासह अंबाजोगाई न्यायालयात प्रत्यक्ष उपस्थित राहून आदेशाची अंमलबजावणी करून परतल्याचे समोर आले आहे. न्यायालयीन कामकाज सुरू असताना वरिष्ठ न्यायिक अधिकाऱ्याच्या दालनात जाऊन आदेशाची अंमलबजावणी करण्याची घटना अंबाजोगाईच्या न्यायालयीन इतिहासात चर्चेचा विषय ठरली आहे.

या संपूर्ण प्रकरणामुळे अंबाजोगाई न्यायालयातील न्यायिक व प्रशासकीय वातावरणात मोठी चर्चा सुरू झाली असून, मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशातील नेमक्या बाबी, कारवाईची पार्श्वभूमी आणि पुढील प्रशासकीय प्रक्रिया काय असेल, याकडे आता विधी क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

न्यायालयीन व्यवस्थेतील शिस्त आणि संस्थात्मक स्वायत्तता कायम ठेवताना प्रत्येक कारवाईबाबत आवश्यक ती स्पष्टता आणि पारदर्शकता राखली जाणे हीच या घटनेतून पुढे येणारी महत्त्वाची अपेक्षा आहे.

# दिशा सालियान मृत्यूचा तपास आता CBIकडे

**सहा वर्षांत प्रश्न सुटले नाहीत; तपासाने उत्तरे देण्याऐवजी नवे प्रश्न निर्माण केले : मुंबई उच्च न्यायालय**

डेवलप्ड नेशन्स
developednationslaw@gmail.com

**मुंबई :** दिशा सालियान यांच्या मृत्यूच्या प्रकरणातील सहा वर्षांचा तपास प्रश्नांच्या भोवऱ्यातच राहिल्याचे निरीक्षण नोंदवत मुंबई उच्च न्यायालयाने या प्रकरणाचा तपास केंद्रीय अन्वेषण विभागाकडे (CBI) सोपविण्याचे आदेश दिले. पोलिसांनी केलेली चौकशी अपुरी ठरल्याचे नमूद करत न्यायालयाने प्रथमदर्शनी आढळलेल्या विसंगतींच्या पार्श्वभूमीवर दखलपात्र गुन्ह्याचा तपास करण्याची आवश्यकता व्यक्त केली. मात्र, न्यायालयाने कोणत्याही व्यक्तीला दोषी ठरविलेले नसून, गुन्हा झाला आहे की नाही हे CBIच्या तपासातून स्पष्ट होईल, हेही आदेशात स्पष्ट केले आहे.

न्यायमूर्ती सारंग व्ही. कोतवाल आणि न्यायमूर्ती रंजितसिन्हा राजा भोसले यांच्या खंडपीठाने हा आदेश दिला. पोलिसांनी आतापर्यंत प्रामुख्याने फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १७४ अंतर्गत चौकशी केली. मात्र, या प्रकरणातील परिस्थिती पाहता केवळ आकस्मिक मृत्यूची चौकशी पुरेशी नसून दखलपात्र गुन्ह्याच्या अनुषंगाने सखोल तपासाची गरज असल्याचे न्यायालयाने नमूद केले.

पोलिसांनी २०२० मध्ये आणि त्यानंतर २०२३ मध्ये फेरतपास करूनही आत्महत्येचा निष्कर्ष कायम ठेवला होता. महाराष्ट्र सरकारच्या निर्देशानंतर करण्यात आलेल्या फेरतपासाचा अहवाल एप्रिल २०२६ मध्ये सादर करण्यात आला आणि मे २०२६ मध्ये तो स्वीकारण्यात आला. या फेरतपासातही नवा पुरावा आढळला नसल्याचे पोलिसांनी नमूद केले होते.

मात्र, न्यायालयासमोर आलेल्या बाबींमुळे तपासाच्या पद्धतीवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले. घटनास्थळी पोहोचूनही पंचनामा नऊ तासांहून अधिक काळ उशिराने करण्यात आला. या विलंबाचे समाधानकारक स्पष्टीकरण नसल्याचे न्यायालयाने नमूद केले. घटनास्थळी पोलिसांच्या उपस्थितीबाबतच्या CCTV नोंदी आणि तपासातील उल्लेख यामध्येही विसंगती असल्याचे निदर्शनास आले.

घटनास्थळी रक्त आढळल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले असतानाही रक्ताने माखलेली माती जप्त करण्यात आली नसल्याची बाबही न्यायालयाने अधोरेखित केली. शवविच्छेदन अहवालातील जखमा आणि बाराव्या मजल्यावरून पडल्याच्या कथित घटनेचा संबंध तपासण्यासाठी तज्ज्ञांच्या मताची आवश्यकता असल्याचेही न्यायालयाने सूचित केले.

फॉरेन्सिक तपासातील काही बाबींवरही प्रश्न उपस्थित झाले. कपड्यांवरील रक्ताचे प्रमाण अपेक्षेपेक्षा कमी असल्याबाबत तपास अधिकाऱ्यांनीच शंका व्यक्त केली होती. त्याचबरोबर लॅपटॉप आणि मोबाईलसारखे महत्त्वाचे इलेक्ट्रॉनिक पुरावे घटनास्थळाच्या पंचनाम्यावेळी जप्त झाले नाहीत. ते घटनेनंतर काही दिवसांनी, १७ जून २०२० रोजी जप्त करण्यात आले.

### तपासाने प्रश्न मिटवले नाहीत; वाढवले

न्यायालयाने या प्रकरणातील सर्वांत महत्त्वाचे निरीक्षण नोंदविताना म्हटले की, दोन टप्प्यांत आणि जवळपास सहा वर्षे तपास होऊनही अनेक प्रश्न अनुत्तरित आहेत. कलम १७४ अंतर्गत चौकशीचा उद्देश इतका प्रदीर्घ तपास करणे नाही. आतापर्यंतच्या तपासामुळे प्रश्नांची उत्तरे मिळण्याऐवजी अधिक प्रश्न निर्माण झाले आहेत. त्यामुळे स्वतंत्र आणि सखोल तपासाची गरज असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.

### CBIकडून FIR; तपासाला नवी दिशा

न्यायालयाने मुंबई विभागातील CBIच्या प्रभारी अधिकाऱ्याला अनुभवी वरिष्ठ अधिकाऱ्याची तपासी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्याचे निर्देश दिले आहेत. संबंधित याचिकाकर्त्याचा जबाब नोंदवून FIR दाखल करावी आणि दिशा सालियान यांच्या मृत्यूशी संबंधित सर्व बाबींचा तपास करावा, असे आदेशात नमूद आहे. तपास सध्याच्या भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (BNSS), २०२३मधील लागू तरतुदींनुसार करण्यात यावा, असेही न्यायालयाने स्पष्ट केले आहे. तपासात गुन्हा झाल्याचे निष्पन्न झाल्यास सक्षम न्यायालयात योग्य अहवाल दाखल करावा; गुन्हा सिद्ध न झाल्यास त्यानुसार अंतिम अहवाल सादर करण्याची मुभा CBIला आहे.

CBIच्या निष्कर्षाशी याचिकाकर्ता असहमत असल्यास त्याला कायद्यानुसार निषेध याचिका दाखल करण्याचा मार्ग खुला राहणार आहे. दरम्यान, मळवणी पोलिस ठाण्यातील संबंधित अधिकाऱ्यांनी प्रकरणातील कागदपत्रे आणि जप्त वस्तू CBIच्या तपासी अधिकाऱ्याकडे सुपूर्द कराव्यात, असेही न्यायालयाने निर्देश दिले.

NATARAJ REALTY
Nataraj Realty
CIVIL ENGG. & CONTRACTORS
PROMOTERS & BUILDERS
Vikram Agarwal B.E. Civil
+91 9766532648
1041, Nataraj Court, Shukrawar Peth, Pune - 411 002
vikrammittal5006@gmail.com www.natarajrealty.com

Registration for Periodicals Title “Developed Nations” vide PRGI Registration No. MHMUL/25/A0594. Printed by Shree Samarth Printers, Published by Sanjay Raghunath Sapkale on behalf of Sanjay Raghunath Sapkale, printed at Pune and published at C - 205, Fortune Empress Society, Haandewadi Road, Autade Haandewadi, Haveli, Hadapsar. Resident Editor : Dr. Ashok Tukaram Balgude, Managing Editor : M J Srikant.